# प्रकरण तीन

## वित्त विभाग

**3.938 शासकीय निधीचे अखर्चित व परत आलेल्या अनुदान रक्कमांबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** जिल्हा परिषद, पालघर वित्त विभागाचे सन 2015-2016 लेखापरीक्षण कालावधीत विवरणपत्र क्रमांक 5 प्रमाणे जनसुविधा, नागरीसुविधा, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल, ठककरबाप्पा, दलित वस्ती सुधारणा, अंगणवाडी अनुदान, 13 वा व 14 वा वित्त आयोग सन 2014-2015 व 2015-2016 मधील प्राप्त अनुदान एकूण रक्कम रूपये 1,25,19,26,216/- असून खर्च रक्कम रूपये 88,20,40,830/- आहे. तसेच रक्कम रूपये 6,53,56,115/- शासन खाती भरणा करावयाची रक्कम रूपये 30,45,29,271/- अशी आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक ददभू-2010/प्र.क्र.62/ पंरा-6, दिनांक 16/09/2010 मधील नियमानुसार जनसुविधा योजनेतून विकास कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येतील. तसेच योजनेवरील खर्चाबाबत आढावा व सनियंत्रण अधिकारी म्हणून जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राहतील. असे असतानाही सन 2015-2016 अखेर अखर्चित रक्कम रूपये 73071082/- राहिली आहे. त्यामुळे विकास कामासाठी त्या वित्तीय वर्षात लाभ झालेला नाही किंवा फलश्रुती झालेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम - 2610/ प्र.क्र. 129/ पंरा-4 दिनांक 16/09/2010 नुसार गावांचा नियोजनबध्द विकास करण्यासाठी ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करून, आराखडा योजनेमधून तसेच अतिरिक्त सुविधा या योजनेअंतर्गत लाभ देणे आवश्यक आहे. परंतु, नागरी सुविधा अंतर्गत अखर्चित रक्कम रूपये 6,13,04,000/- राहिल्यामुळे विकास कामांना किंवा शासनाचा उद्देश साध्य झाल्याचे दिसून येत नाही. तसेच केलेला खर्च किती फलश्रुत झाला? याचा बोध होत नाही.

3) महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-2013/प्र.क्र.03/का-6 दिनांक 17/01/2014 तसेच शासन निर्णय क्रमांक एबावि-2013/प्र.क्र.158/कां-6, दिनांक 29/01/2014 नुसार अंगणवाडी केंद्रांना अनुदान देऊन अंगणवाड्या बांधण्यात येऊन वंचित मुलांना शिक्षणाची व बसण्याची योग्य व्यवस्था व सोय होईल, या उद्देशाने शासनाने अनुदान वाटप केले आहे. असे असतानाही जिल्हा स्तरावरून गटस्तरावर व गटस्तरावरून ग्रामस्तरावर अनुदान वाटप व मागणी केली जाते. परंतु, तरतूद अनुदान मागणी करूनही खर्च केले जात नाही. त्यामुळे शासनाने प्रदान केलेले अनुदानातून विकास न होता बँक खाती पडून राहत आहे. अखर्चित रक्कमांचे विवरणपत्र क्रमांक 5 मध्ये सन 2014-2015 मधील अखर्चित अनुदान '0' दर्शविलेले आहे. प्रत्यक्षात गटस्तरावर / ग्रामस्तरावर अनुदान अखर्चित दिसते. त्यामुळे या वाटप निधीवर मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांचे नियंत्रण असल्याचे दिसून येत नाही.

4) 13 वा वित्त आयोग जनरल बेसिक ग्रांट, जनरल परफॉरमन्स ग्रांट, स्पेशल एरिया बेसिक निधी, स्पेशल एरिया परफॉरमन्स निधी वितरणाबाबतचे निकष, वितरीत निधी पंचायत राज संस्थांनी (जिल्हा परिषद / पंचायत समिती/ ग्रामपंचायत) करावयाच्या बाबी व नियोजन व पालनाबाबत महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक तेविआ - 2010/प्र.क्र.22 / वित्त-4, दिनांक 30/08/2010 मधील नियम अ ते ड व इ नुसार मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार नियंत्रण व सनियंत्रण ठेवल्याचे दिसून येत नाही. सन 2014-2015 ते 2015-2016 मध्ये अनुदानाची प्रदान रक्कम खर्च न करता शिल्लक राहिलेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेचे यावर नियंत्रण असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे शासन निर्णयातील नियम (इ) मधील मार्गदर्शक सुचनांचे पालन केलेले नाही. त्याचप्रमाणे इतर योजनाचेही नियोजन केल्याचे दिसून येत नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 137 नुसार अर्थसंकल्पात व कलम 138 प्रमाणे सुधारित अर्थसंकल्प व 136 प्रमाणे कामे व विकास परियोजनाचे आणि शिल्लक रक्कमांचे वितरण होऊन नियोजन केले असल्याचे दिसून येत नाही.

**3.939 जिल्हा परिषद निधीअंतर्गत अपंगाकरिता राखीव 3 टक्के निधीतील अखर्चित रक्कमाबाबत.**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** जिल्हा परिषद, पालघर सन 2015-2016 या वित्तीय वर्षात उपलब्ध केलेल्या विवरणपत्र क्रमांक 6 नुसार वित्तीय वर्षात जिल्हा परिषद अर्थसंकल्पात केलेल्या तरतुद रक्कम रूपये 72,09,624/- पैकी रूपये 34,60,177/- खर्च केलेला आहे व शिल्लक रक्कम रूपये 37,49,447/- अखर्चित राहिलेली आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 2007 / प्र.क्र.4871/वित्त-3 दिनांक 25/06/2014 नुसार जिल्हा परिषद यांनी त्यांच्या स्वनिधीच्या एकूण उत्पन्नापैकी 3 टक्के अपंगांच्या कल्याण व पुनर्वसनाकरीता तसेच वैयक्तिक लाभाच्या योजनांकरिता अर्थसंकल्पात तरतूद करून खर्च करावयाचा आहे. सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पात शिक्षण विभागासाठी रक्कम रूपये 15,00,000/- तरतूद केली असतानाही, 3% अपंगांसाठी खर्च रक्कम रूपये 0/- केलेला आहे. शिल्लक रक्कम 15,00,000/- अखर्चित राहिली आहे. त्यामुळे अपंगांच्या कल्याणकारी योजना राबविण्याच्या दृष्टीने शिक्षण विभाग उदासीन असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपंग लाभार्थी लाभापासून किंवा कल्याणापासून वंचित राहिले आहेत ही बाब गंभीर आहे.

2) 3 टक्के अपंगाच्या कल्याण व पुनर्वसनासाठी बांधकाम, कृषी, समाजकल्याण, महिला व बालकल्याण विभाग यांनी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीपैकी 50% ते 60% प्रमाणातच खर्च केलेला आहे. त्यामुळे या विभागामार्फत निधीचे योग्य नियोजन केल्याचे दिसून येत नाही. योग्य नियोजनाअभावी अपंग लाभार्थी लाभापासून वंचित राहिले असल्याचे दिसून येते. जिल्हा परिषदेचे विभाग शासन निर्णयाचे अनुपालन करत नसल्याचे दिसून येते.

**3.940 विमा व उपकर कामगार कल्याण कपाती न केल्याबाबत**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीए 2009/प्र.क्र.108/ कामगार-7अ, दिनांक 17/06/2010 मधील मुद्दा क्रमांक 5 अनुसार देयक रकमेतून 1% कामगार कल्याण उपकर कपाती करणे आवश्यक आहे. तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.परा/2000/प्र.क्र 837/ प.रा.8 (35), दिनांक 15/09/2003 नुसार काम सुरु होण्यापूर्वी ठेकेदाराने कामाचा व कामावरील मजुराचा विमा शासकिय विमा निधी, मुंबई यांचेकडे उतरविणे आवश्यक आहे. कामकाज करताना मजुरास काही इजा झाल्यास त्यामधून त्या मजुरास मोबदला मिळू शकतो. परंतु, असा विमा उतरविण्यात आलेला नाही.

2) मुंबई गौण खनिज उत्खनन नियम 1955 चे 18.22 व 22 अनुसूची 1 मधील दर व शासन निर्णय क्रमांक गौखनि 10206/प्र.क्र 57ख, दिनांक 11/02/2010 नुसार दर प्रति घन मीटर रूपये 70.67/- प्रमाणे गौण खनिज कपात करणे असतांनाही काही देयकांतून गौण खनिज कपात केलेले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 37(1) प्रमाणे परिषदेकडे प्राप्त देयकाची वित्त विभागाकडून तपासणी करूनच प्रदान करण्यात येतील. असे असतांनाही कपातीबाबतची दक्षता घेतलेली नाही.

**3.941 अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत**

**जिल्हा परिषद पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 35) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त विभाग, जिल्हा परिषद, पालघर सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत व जिल्हा परिषदेच्या उत्पन्न व खर्चाचे अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही.

अ) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एपिटी-2014/प्र.क्र.-151/आस्था-8 दिनांक 18/12/2014 अन्वये वित्त विभागास खालील पदे निर्माण करण्यात आलेली आहेत.

सहाय्यक लेखाधिकारी - 3 पदे

शासन आदेश क्रमांक एटीपी 1092/सीआर 766/13 दिनांक 07/10/1997 अन्वये सदर पदे ही अंतर्गत लेखापरीक्षण व भांडार पडताळणीसाठी वापरण्यात यावीत, असे नमूद केलेले आहे.

ब) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचे आदेश दिनांक 27/06/2008 अन्वये नविन आकृतीबंधानुसार वित्त विभागात अंतर्गत परीक्षण पथकातील कर्मचारी यांचे पद मंजूर आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक एटीपी 1092/सीआर 766/13, दिनांक 07/10/1997 व दिनांक 16/09/1997 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या कामासाठी निर्माण करण्यात आलेल्या अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी या पदाच्या कार्यसुचीबाबत शासनाचे सुस्पष्ट असे निर्देश दिले आहे की, अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी (वर्ग 1) व लेखाधिकारी (वर्ग 2) यांनी लेखापरीक्षणाबरोबर भांडार पडताळणीचे सुद्धा काम पहावे व हे काम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नियंत्रणाखाली करण्यात येतील.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे महत्वाचे काम स्थानिक पातळीवर अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी (वर्ग 1) व लेखाधिकारी (वर्ग 2) यांना सोपवू शकतील.

2) लेखापरीक्षण करताना 100% उत्पन्नाचे लेखापरीक्षण करतील व खर्चातील 6 महिन्यातील दोन महिन्याचे अंतर्गत लेखापरीक्षण व बाकी चार महिन्याचे पुनर्विलोकन करण्याचे बंधन राहील. तसेच गंभीर बाबी आढळल्यास त्याचा अहवाल त्वरीत विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी व संविधानिक लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांना सादर करावा, असे सुस्पष्ट निर्देश असतांना वित्त विभागाने अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम केलेले नाही. अंतर्गत लेखापरीक्षणाचे कामकाज न केल्यामुळे विभाग व गटस्तरावर काही गैरव्यवहार होऊन शासनाचे व जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान होऊ शकते.

**3.942 संगणक व लॅपटॉप खरेदीमधील अनियमीतता.**

**जिल्हा परिषद रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** प्रमाणक क्रमांक 227, दिनांक 24/06/2015 अन्वये रक्कम रूपये 9,62,809/- 16 संगणक व 5 लॅपटॉप S.K.Sales Services, Roha यांचेकडून खरेदी केले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1968 मधील नियम 90 (1) मध्ये निर्देशीत केल्यानुसार सदर साहित्याची Dead Stock Register (नमुना 32) मध्ये नोंद घेणे आवश्यक आहे.

2) साहित्याच्या Warrenty Period पेक्षा कमी नाही एवढया कालावधीसाठी पुरवठादाराकडून 5 टक्के सुरक्षा अनामत किंवा सुरक्षा अनामत रकमेएवढी Bank Guarantee घेणे आवश्यक आहे. तथापि, सदर कार्यवाही अंमलात आणलेबाबत नस्तीमध्ये आढळून आले नाही.

3) साहित्य प्राप्त झाल्यानंतर संबंधीत पुरवठादाराला प्रदान करतेवेळी महाराष्ट्र शासन, उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4, दिनांक 30/10/2015 मधील परिच्छेद क्रमांक 4.7(इ) (ई) मधील तरतुदीनुसार देय निव्वळ रक्कमेच्या 90 टक्के आणि साहित्याचा तांत्रिक अहवाल प्राप्त झालेनंतर उर्वरित 10 टक्के रक्कम अदा करणे आवश्यक आहे. तथापि, यानुसार अंमलबजावणी करण्यांत आली नसल्याचे लेखापरीक्षणात निदर्शनास आले आहे.

**3.943 जिल्हा परिषद गुंतवणूकीबाबत.**

**जिल्हा परिषद रत्नागिरी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी सन 2015-2016 च्या लेखा परिक्षणात गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) गुंतवणूक नोंदवहीची तपासणी केली असता हस्तांतरित योजनेतून रक्कम रुपये 03 कोटीची 42 दिवसांकरिता गुंतवणूक करणेत आली होती. सदर गुंतवणूकीची मुदत दिनांक 22/03/2016 रोजी पूर्ण होत असतांना मुद्दल व व्याज (रुपये 1,54,918/-) दिनांक 31/03/2016 रोजी बँकेने बँक विवरणपत्रानुसार जमा केल्याचे दिसून येते. तरी जिल्हा परिषद खातेमध्ये बँकेने उशिरा रक्कम जमा केलेने जिल्हा परिषदेचे रक्कम रुपये 29,508/-

व्याजाचे नुकसान झाले आहे. तरी जिल्हा परिषदेकडील गुंतवणूकीची मुदत पूर्ण होताच मुद्दल व व्याज निधी तारखेस जिल्हा परिषद खातेमध्ये जमा होणे आवश्यक आहे अथवा गुंतवणूक पूर्णघटित होणे आवश्यक आहे. तरी याबाबत पुढील कालावधीत दक्षता घेण्यात यावी.

2) जिल्हा परिषद सेस (स्वनिधी) मधील गुंतवणूक दिनांक 29/12/2015 पासून पुढे केल्याचे दिसून येते. सदर गुंतवणूकीच्या रक्कमा मोठ्या (30 कोटीच्या पुढे) असल्याने गुंतवणूक माहे ऑक्टोबर / नोव्हेंबर मध्ये केल्यास जिल्हा परिषदेस व्याजाचा फायदा होईल. माहे सप्टेंबर / ऑक्टोबर ते मार्च अखेर सदर खात्याच्या विवरणपत्राची पाहणी केली असता 19 कोटीच्या पुढे शिल्लक दिसून येते. वास्तविक माहे सप्टेंबरमध्ये वार्षिक लेख्यास मंजूरी घेतल्यानंतर ऑक्टोबरमध्ये वित्त समितीच्या व सर्वसाधारण सभेची मंजूरी घेऊन गुंतवणूक केलेस जिल्हा परिषदेस प्राप्त झालेल्या सन 2015-2016 व्याजाच्या (एकूण व्याज रुपये 46,19,535/-) रक्कमा पाहता जिल्हा परिषदेने सदर गुंतवणूक माहे ऑक्टोबर / नोव्हेंबर मधे केल्यास जिल्हा परिषदेस व्याजाचा फायदा होईल. तरी याबाबत दक्षता घेणेत यावी. तसेच जिल्हा मध्यवर्ती बँकेत ठेवण्यात आलेल्या गुंतवणूकीच्या रक्कमांच्या सुरक्षिततेबाबत शासन निर्णयानुसार दक्षता घेण्यात आलेली नाही. याबाबत जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या आर्थिक स्थितीविषयी शासनाने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्याचे पालन केल्याचे दिसून आले नाही. तसेच उपरोक्त जमा ठेवींबाबत रक्कमेस विमा संरक्षण घेतल्याचे निदर्शनास आलेले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 चे नियम 123 नुसार वर्षाच्या अखेरीस देय व्याज, जमा झालेले व्याज व शिल्लकी व्याज मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या सहीने नोंदविणेत यावे व वर्षाच्या अखेरीस शिल्लक गुंतवणूक पुढील वर्षाची सुरुवातीची शिल्लक म्हणून दाखविण्यात यावी. असे असतांना याप्रमाणे कार्यवाही झालेचे दिसून येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता 1968 चे नियम 124 नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी प्रमाणपत्र गुंतवणूक नोंदवहीत नोंदविलेले नाही.

**3.944 अखर्चित निधीबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2015-2016 अखेर त्याप्रमाणे जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांचेकडे सन 2013-2014 अखेर बांधकाम विभाग व आरोग्य विभाग यांचेकडील एकूण रूपये 2,54,87,653/- व सन 2014-2015 अखेर शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व कृषि विभाग इत्यादींकडील एकूण रक्कम रूपये 10,52,65,498/- इतकी मिळून एकूण रूपये 13,07,53,151/- एवढी शासन निधी अखर्चित रक्कम म्हणून शिल्लक ठेवण्यांत आला आहे.

वरील परिच्छेदांत नमूद केलेप्रमाणे अखर्चित निधीची रक्कम ही मोठया प्रमाणावर शिल्लक असून सदर शिल्लक निधीची रक्कम आज अखेर शासन सदरी जमा करण्यांत आली नाही. याबाबतचा खुलासा करण्यांत यावा. शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-10.02/प्र.क्र.128 / अर्थोपाध्याय, दिनांक 06/06/2008 अन्वये अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर खर्च करण्यांत आला नसेल, तर असा अखर्चित शिल्लक राहीलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे.

**3.945 घसारा निधीबाबत.**

**जिल्हा परिषद सिंधुदुर्ग, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांच्या वित्त विभागाच्या सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणांत घसारा निधी खात्याचा तपशिल व अर्थसंकल्पातील तरतूद पाहता सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पान्वये घसारा निधी मध्ये शिक्षण, इमारत दळणवळण, पाटबंधारे, सार्वजनिक आरोग्य, सामान्य प्रशासन विभाग, शेती इत्यादी विभागाची मिळून रूपये 6,18,600/- इतकीच रक्कम घसारा निधीमध्ये जमा करावयाचे अंदाज वर्तविले आहेत. सदर अंदाज अर्थसंकल्पात समाविष्ट करताना महाराष्ट्र जिल्हा परिषद व लेखा संहिता 1968 चे

नियम 241 नुसार व शासनाची अधिसूचना क्रमांक झेडपीए-1080/4768/सीआर-1459/ 28, दिनांक 01/01/1988 नुसार जिल्हा परिषदेच्या सर्व मत्त्यांवरील विवरणपत्रात विहीत केलेल्या दराने घसाऱ्याची गणना करुन रक्कम जमा केलेबाबत लेखापरिक्षणांस खात्री करता आली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेने त्यांचेकडील पीआरबी नोंदवहीवरील सर्व इमारती व बांधकामे (प्राथमिक शाळा, आरोग्य केंद्रासह सर्व इमारती) तसेच जिल्हा परिषदेकडील सर्व वाहने इत्यादीवर घसा-याची गणना करुनच अर्थसंकल्पात जमा करावयाची रक्कम काढल्याबाबत लेखापरीक्षणास खात्री करता आली नाही.

जिल्हा परिषदेने घसारा निधीत ढोबळमानाने रकमा अर्थसंकल्पात समाविष्ट केल्याअसून सन 2015-2016 या वित्तीय वर्षात ढोबळमानाने रूपये 27,93,989/- इतकी रक्कम घसारा निधी खाते क्रमांक 11239 मध्ये जमा केल्याचे दिसून येते.

**3.946 शासकीय अनुदानाच्या व जिल्हा परिषद निधीच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत गुंतून पडलेल्या करंट व सेव्हींग खात्यावरील रकमेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** शासकीय अनुदानाच्या व जिल्हा परिषद निधीच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत गुंतून पडलेल्या करंट व सेव्हींग खात्यावरील रकमेबाबत जिल्हा परिषद, धुळे यांचे मागील 4 ते 5 वर्षा पासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक यांचेकडे रुपये 36,74,69,229/- इतका शासकीय निधी व्यवहाराशिवाय गुंतुन पडलेला आहे. जिल्हा परिषदेने या बॅंकेतून व्यवहार बंद करुन स्टेट बॅंके कडे वर्ग केलेले आहेत. सदयस्थितीत या बॅंकेत व्यवहार बंद आहेत व रक्कम गुंतुन पडलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत शासकीय अनुदान हस्तांतर व अभिकरण निधीच्या रूपये 27,65,11,181/- इतकी रक्कम गेल्या 4 ते 5 वर्षा पासून गुंतुन पडलेली आहे. सदर रकमेवर 7 टक्के प्रमाणे व्याजाची परिगणना केली असता 1 कोटी 51 लाख इतक्या रकमेपर्यत शासनाचे दायीत्व कमी करणे शक्य झाले असते.

2) जिल्हा परिषद निधीच्या रूपये 9,09,58,048/- इतकी रक्कम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत गुंतुन पडलेली आहे. सदर रक्कम फिक्स डिपॉझीट खाती ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे 7 टक्के प्रमाणे परिगणना केली असता रूपये 63,00,000/- इतक्या रकमे प्रर्यत जिल्हा परिषदेला व्याजाचे नुकसान झालेले दिसून येत आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधीनियम 1961 चे कलम 141 अे व महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2009/प्रक्र-522/वित्त-9/ दिनांक 10/12/2010 नुसार जिल्हा परिषदेच्या रक्कमा वसुली बाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्या आदेशातील सुचना क्रमांक 6 नुसार संबंधीतांच्या मालमत्तेतून महसूल खात्यामार्फत म्हणजेच आरआरसीव्दारे रक्कमा वसुल करणेबाबत कार्यवाही करणेबाबत तरतूद विषद केलेली आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेची गुतंलेली रक्कम वसूलीबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**3.947 शासकीय अनुदानाची अनुदान जमा व खर्च नोदवही नमुना क्रमांक 90 विहित नमुन्यात ठेवणेबाबत.**

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** लेखा संहिता 1968 मधील नियम क्रमांक 244 नुसार विहित नमुन्यातील नोंदवही नमुना क्रमांक 90 शासकीय अनुदानाची जमा व खर्चाची मुख्य लेखाशिर्ष व उपशिर्ष निहाय नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदने विहित नमुना 90 मध्ये लेखा शिर्ष निहाय जमा व खर्चाची नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे लेखापरीक्षण कालावधीत जिल्हा परिषदेल लेखाशिर्षनिहाय किती अनुदान प्राप्त झालेले आहे व जिल्हा परिषद लेखार्शिर्षनिहाय किती अनुदान खर्च केलेले आहे? हे तपासता आलेले नाही. तसेच लेखाशिर्षनिहाय शिल्लक अनुदान याची पडताळणी करता आलेली नाही.

शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे त्रैमासिक विवरण शासनास सादर करणे आवश्यक असतांना जिल्हा परिषदेने विहित नमुन्यातील शासकीय अनुदानाचे जमा व खर्चाचे विवरण पत्र शासनास सादर केलेले नाही. लेखा

संहिता 1968 नियम 244 नुसार विहित नमुन्यातील शासकीय जमा व खर्चाची नोंदवही ठेवण्यात यावी व अखेर शिल्लक काढण्यात येऊन शिल्लक रकमेचे विवरण लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. शासकीय अनुदानाची नोंदवही न ठेवल्याने जिल्हा परिषदेकडे मोठया प्रमाणात अखर्चित रकमा आहेत. शासन निर्णय दिनांक 06/06/2008 नुसार अनावर्तीती निधीच्या दोन वर्ष पर्यत खर्च करणे आवश्यक रकमेशिवाय इतर सर्व रकमा हया शासकीय कोषागारात भरणा करणे आवश्यक आहे.

शासकीय अनुदानाची अनुदान जमा व खर्च नोदवही नमुना क्रमांक 90 विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. शासकीय अखर्चित अनुदानाचे त्रैमासिक विवरणपत्र शासनास सादर करण्यात आलेले नाही. जिल्हा परिषदेकडे सन 2015-2016 अखेर हस्तांतर निधी रुपये 1,55,16,31,068/- व अभिकरण निधी रुपये 34,63,92,358/- इतकी रक्कम शिल्लक आहे. नमुना 90 ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीचा निधी किती आहे? या बाबत पडताळणी करता आलेली नाही.

उपरोक्त नमुद अभिप्रायाची पूर्तता करण्यात यावी.

### 3.948 अनुदान निर्धारण

**जिल्हा परिषद धुळे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** महाराष्ट्र शासन**,** ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आसीएन-1986/सीआर-606/27 दिनांक 02/12/1986 व शासन परिपत्रक जिपनी/2000/प्र.क्र.2127/27, दिनांक 12/05/2000 नुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर माहे ऑगस्ट पर्यत जिल्हा परिषदेने वार्षिक डिसेंबर अखेर पर्यत मागील वर्षात मिळालेल्या अनुदानाचे निर्धारण करणे आवश्यक आहे. मागील लेखापरीक्षण अहवाल परिच्छेद क्रमांक 32 प्रमाणे परिच्छेद नोंदविण्यात आलेला आहे. सन 2015-2016 या वर्षाअखेर 10 विभागांचे अनुदान निर्धारण प्रंलबीत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक दिनांक 12/05/2000 नुसार आर्थीक वर्ष संपल्या नंतर माहे ऑगटस पर्यत वार्षीक लेखा पूर्ण करुन माहे डिसेंबर अखेर पर्यंत मागील वर्षापर्यत मिळालेल्या अनुदानाच्या निर्धारण करणे आवश्यक आहे. उपरोकत नमुद प्रमाणे कार्यालयाचे अनुदान निर्धारण प्रलंबीत आहे. शासन निर्णय दिनांक 06/06/2008 नुसार शिल्लक अनुदानाच्या रकमा कोषागारात जमा करणे आवश्यक आहे.

### 3.949 अंतर्गत लेखापरीक्षण प्राधान्यक्रम ठरवून पूर्ण न करणे.

**जिल्हा परिषद जळगाव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सन 2015-2016 वित्त विभाग जिल्हा परिषद, जळगाव येथील अंतर्गत लेखापरीक्षण नस्तीची तपासणी केली असता त्याबाबत लेखापरिक्षणाचे पुढीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 39 मधील परिशिष्ट 4 मध्ये दिलेल्या नियमानुसार वित्त विभाग, जिल्हा परिषद, जळगाव यांनी त्यांचे अंतर्गत असलेल्या पंचायत समित्या तसेच विभागाचे लेखापरिक्षण प्रत्येक वर्षी करणे आवश्यक आहे. तसेच परिशिष्ट 4 चे नियम 6 अन्वये विहित करण्यात आलेली लेखापरिक्षा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. विभागाने वित्त, ग्रामीण पाणीपुरवठा, लघुसिंचन, शिक्षण, समाजकल्याण विभाग, बांधकाम, आरोग्य, भविष्य निर्वाह निधी, सामान्य प्रशासन विभाग, ग्रामपंचायत तसेच पंचायत समिती भडगाव, चोपडा, जळगाव व पंचायत समिती जामनेर या संस्थांचे लेखापरीक्षण केलेले नाही. याबाबत पुर्तता अनुपालन पडताळणीस दर्शवावी.

### 3.950 14 वा वित्त आयोग बँक ताळमेळ व ग्राम पंचायतीस अदा केलेल्या अनुदान वितरणाबाबत.

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

1) बँक ताळमेळ मध्ये तफावत रक्कम 11,96,80,613/- असून सदर तफावत कशाबाबत याचा स्पष्ट तपशील रोखवहीत नमूद नाही. ग्रामपंचायतीस वितरीत केलेल्या अनुदानापैकी किती रक्कम दिनांक 31/03/2016 अखेर ग्रामपंचायत बँक खात्यावर जमा होणे बाकी आहे, याचा स्पष्ट तपशील रोखवहीत नमूद नाही. महाराष्ट्र जिल्हा

परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 57 अन्वये रोखवहीतील अखेरची शिल्लकेची रुजवात बँकेच्या अभिलेख्याप्रमाणे येणाऱ्या शिल्लकेशी करण्यात येईल आणि रोखवहीतील अखेरची शिल्लकेतील फरकाचे विश्लेषण महिन्याच्या कामाच्या शेवटच्या दिवशी काढणे आवश्यक असून, फरकातील चूका दुरुस्त करण्यासाठी सत्वर आणि प्रभावी उपाययोजना करणेबाबत निर्देश असून विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) जिल्हा परिषदेने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे आदेश जावक क्रमांक अर्थ/14वाविआ/28/16, दिनांक 14/01/2016 अन्वये सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया ला धनादेश क्रमांक 111601, दिनांक 14/01/2016 रक्कम रूपये 85,64,50,800/- चा 90 टक्के हिस्सा व आदेश क्रमांक जावक क्रमांक अर्थ/14वाविआ/159/16, दिनांक 17/02/2016 अन्वये सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया ला धनादेश क्रमांक 111602, दिनांक 17/02/2016 रक्कम रूपये 9,51,61,200/- चा 10 टक्के हिस्सा असा एकूण 100 टक्के हिस्सा सन 2015-2016 करीता बेसिक ग्रांट ग्रामपंचायतनिहाय RTGS/NEFT द्वारे अनुदान वितरण करण्याचे आदेश दिलेले आहे. परंतु, सदर आदेश सोबत जोडलेल्या ग्रामपंचायतनिहाय यादीनुसार बँक स्क्रोलची तपासणी केली असता वितरीत केलेली रक्कम RTGS/NEFT पद्धतीनुसार त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी ग्रामपंचायत खात्यावर जमा होणे अपेक्षित असताना वरील सदर रक्कम दिनांक 31/03/2016 अखेरपर्यंत जमा होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ज्या ग्रामपंचायतीला दिनांक 31/03/2016 पर्यंत निधी प्राप्त झाला नाही, त्या पंचायती आर्थिक लाभापासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

3) वरील आदेशातील ज्या रक्कमा दिनांक 31/03/2016 पर्यंत ग्रामपंचायत खात्यावर जमा झाल्या नाही, त्या रक्कमा RTGS/NEFT पद्धतीनुसार त्वरित मूळ खात्यावर जमा होणे आवश्यक आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. दिनांक 31/03/2016 नंतर देखील बऱ्याच रक्कमा RTGS Return म्हणून बँक स्क्रोला जमा होत असल्याचे दिसून आले. त्यामुळे मूळ खात्यावर जमा होणाऱ्या रक्कमेवर जे व्याज मिळणार त्या व्याजापासून शासनाचे नुकसान झाल्याचे दिसून येते.

4) ज्या ग्रामपंचायत खात्यावर अनुदान जमा झाले नाही, त्या ग्रामपंचायतीची यादी बँकेने अनुदान जमा न होण्याचे कारणासह जिल्हा परिषदेस बँकेने पत्र क्रमांक R/46/2015-16, दिनांक 02/02/2016 अन्वये कळविले आहे. त्या पत्रात नमूद केलेल्या ग्रामपंचायतिची रक्कम व जिल्हा परिषदेने वरील आदेशासोबत जोडलेल्या ग्रामपंचायतीची रक्कम यात तफावत असल्याचे दिसून आले.

त्यानुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडील यादीतील रक्कम व बँकेने पाठविलेल्या यादीतील रक्कम यात रूपये 37,53,887/- तफावत असल्याचे दिसून येते. सदरील तफावतीबाबत जिल्हा परिषदेने सखोल चौकशी करून त्यात काही गैरप्रकार / अफरातफर आढळल्यास संबधीतावर नियमोचित कार्यवाही करावी.

तरी उक्त नमूद अनियमिततांबाबत अचूक बँक ताळमेळ सादर करुन, नियमोचित कार्यवाही करुन पूर्तता दर्शवावी.

**3.951 अंतर्गत लेखापरीक्षणबाबत.**

**जिल्हा परिषद अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात जिल्हा परिषद अंतर्गत पंचायत समिती व विभागांचे अंतर्गत लेखापरीक्षण अहवालाची मागणी करुन अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल पडताळणीस उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे सदर अहवालाची पडताळणी करता आली नाही.

याबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 39 तरतुदीच्या अनुषंगाने तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील आदेश दिनांक 17/04/2001 अन्वये जिल्हा परिषदेअंतर्गत पंचायत समित्या व विविध विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण करण्याची जबाबदारी वित्त विभागावर सोपविण्यात आलेली आहे. वित्त विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी पंचायत समित्यांचे व विभागांचे अंतर्गत लेखापरिक्षण केले नाही. सदरची बाब गंभीर आहे. तरी नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

**3.952 जिल्हा परिषदांकडे जिल्हा निधीतून निर्माण केलेल्या पदाबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, पुणे यांचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षण कालावधीत जिल्हा निधीतून निर्माण केलेल्या पदाबाबत अभिलेखे तपासणी केले असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

जिल्हा परिषद, पुणेद्वारा स्वतःचे निधीतून निर्माण केलेली वित्त विभागातील पदे (1 कनिष्ठ लेखा अधिकारी व यांत्रिकी विभागाकडील पदे) आहेत. वित्त विभागासाठी निर्माण पदांचे वेतनावरील खर्च जिल्हा परिषद स्वतःचे उत्पन्नातून जरी करीत असली तरी सदरील कर्मचारी यांचे रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान भरणा करण्यात येत नाही. वित्त विभागा अंतर्गत निर्माण पदावरील कर्मचारी यांची बदली / बढती तत्सम किंवा उच्च पदावर होत असल्याने रजा वेतन अंशदान व निवृत्ती वेतन अंशदान भरणा करणे आवश्यक ठरते. तथापि, अशी कार्यवाही करण्यात येत नाही. सबब वित्त विभागाकडील जिल्हा परिषदेद्वारा निर्मित 1 कनिष्ठ लेखा अधिकारी (वित्त विभाग) यांचे रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान थकीत रक्कम व त्यावरील व्याज पद निर्मिती ते आजतागायत शासन खाती भरणा करण्यात यावे.

**3.953 अंतर्गत लेखापरीक्षण न केलेबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** जिल्हा परिषद, वित्त विभाग यांचे सन 2015-2016 वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणामध्ये अंतर्गत लेखापरीक्षण विभागाकडून जिल्हा परिषदेकडील सर्व विभाग व 13 पंचायत समित्यांचे अंतर्गत लेखापरीक्षण न करण्यात आल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 च्या परिशिष्ट 4 नियम 39 भाग 4 अन्वये अंतर्गत लेखापरिक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामध्ये भाग 1 सामान्य वित्तीय तत्वे, भाग व तपशीलवार सूचना या अनुषंगाने विविध आस्थापना देयके, प्रवास भत्ता देयके, आकस्मिक खर्चाची देयके, सहाय्यक अनुदाने, निवृत्ती वेतन, महसूल परतावा ई. सह सर्व बाबींच्या अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समितीस्तरावर अंतर्गत लेखापरीक्षण व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 च्या नियम 3, परिशिष्ट 1 मध्ये नमूद मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची कर्तव्ये व कार्य यातील परिशिष्ट 1 नियम 5(2) मध्ये कालबद्ध तपासणीबाबत निर्देश नमूद आहेत. परिशिष्ट 1 नियम 5 (3) नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पंचायत समित्यांच्या लेख्यांच्या तपासणीबाबत निदर्शनास आलेले दोष व नियमबाह्यता गटविकास अधिकारी यांच्या निदर्शनास आणतील व परिशिष्ट 1 मधील नियम 5(4) नुसार सदरच्या तपासणी मध्ये निदर्शनास आलेल्या अनियमितता, नुकसान व अन्य नियमबाह्यता यांचे अहवाल संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, विभागीय आयुक्त यांना नियमान्वये सादर करतील.

2) महाराष्ट् शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाअ/1097/प्र.क्र.1960/का-33, दिनांक 16/09/1997 अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या कामासाठी निर्माण करण्यात आलेल्या अंतर्गत लेखापरीक्षण अधिकारी वर्ग 1 व लेखा अधिकारी वर्ग 2 यांच्या पदांच्या जबाबदाऱ्या व कार्यसूचीबाबत नमूद करण्यात आलेले आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन पत्र क्रमांक लेखाअ/1097/प्र.क्र.1960/ का-33, दिनांक 05/03/1999 अन्वये अंतर्गत लेखापरीक्षण व भांडार पडताळणी पथकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्यांबाबत नमूद केले आहे.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, आदेश क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.56/33, दिनांक 17/04/2001 अन्वये जिल्हा परिषदेमधील महाराष्ट्र वित्त व लेखा संवर्गातील अधिकाऱ्यांच्या कामांच्या विभागणीबाबत निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने परिशिष्ट 2 मध्ये वरिष्ठ लेखा अधिकारी (जूने अंतर्गत लेखापरिक्षा अधिकारी) हे पद यातील अनुक्रमांक 10 नुसार वरिष्ठ लेखा अधिकारी व अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी

ही 2 स्वतंत्र पदे निर्माण होईपर्यंत स्थानिक निधी लेखा, महालेखापाल व आयुक्त या सर्वांचे लेखा आक्षेपाबाबत व लेखापरीक्षणाबाबत समन्वयक म्हणून काम करणे, वरिलप्रमाणे दोन स्वतंत्र पदे निर्माण झाल्यानंतर सदर काम अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी यांचे राहील.

जिल्हा परीषद व पंचायत समिती स्तरावर वरीलप्रमाणे 1 ते 4 अन्वये अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत तरतूद करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्षात अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत तशी कार्यवाही होउन स्थानिक निधी लेखापरीक्षा विभागाला अहवाल प्राप्त होत नाहीत.

5) तसेच वित्त विभागाकडून सर्व पंचायत समित्यांचे वर्षातून 2 वेळा अंतर्गत लेखापरीक्षण करणे आवश्यक असतांना तसे न झाल्यामुळे अंतर्गत लेखापरीक्षण न केल्यामुळे अपहारीत / आर्थिक गैरव्यवहार प्रकरणे वेळीच उघडकीस येत नाहीत. त्यामुळे वित्तीय नियंत्रण व आर्थिक शिस्त ठेवण्याचा शासनाचा उद्देश सफल होत नाही.

**3.954 नियमबाह्यरित्या मंजूर केलेल्या खाते तसलमातीबाबत.**

**जिल्हा परिषद पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 26) -** सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 210 अन्वये (अ) स्थायी अग्रिम व (ब) इतर अग्रिम याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. इतर अग्रिमाबाबत विभाग प्रमुख तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना रुपये 1,000/- पर्यंत अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार प्रदान असताना खालीलबाबत रुपये 1,000/- पेक्षा जास्त रकमेचे अग्रिम मंजूर झालेले आहे. तसेच सदर रकमा ह्या सन 2001 पासून प्रलंबित असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 220 नुसार तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मधील नियम क्रमांक 142 व 143 नुसार आगावु रक्कमा वेळीच वसुल होणे आवश्यक असताना, जिल्हा परिषदेकडील जुन्या खाते तसलमात रक्कमांचे दिनांक 31/03/2016 अखेर समायोजन करण्यात आलेले नाही.

2) उपरोक्त अनुक्रमांक 1 अन्वये अदा करण्यात आलेले अग्रिमाचा तपशिल नमुना नंबर 79 मध्ये नमुद नसल्याने अग्रिम शासकीय कामासाठीच देण्यात आले याबाबत खात्री होत नाही. तसेच उपरोक्त अनुक्रमांक 2 अन्वये श्री. खंडागळे यांनी अपहार केलेल्या रकमेवरील व्याजापोटी अग्रिम अदा करण्यात आलेले आहे. सदर अग्रिम कोणत्या नियमान्वये मंजूर करण्यात आले? तसेच अग्रिम वसुलीबाबतची कार्यवाही लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही. अनुक्रमांक 1 आणि अनुक्रमांक 2 ही अग्रिमे सन 2001 पासून थकीत असल्याचे दिसुन येते. सदर अग्रिमाच्या वसुली अभावी जिल्हा परिषदेची रक्कम नाहक गुंतुन राहिलेली रक्कम व्याजासह वसुल करुन जिल्हा परिषद निधीत जमा होणे आवश्यक आहे.

**3.955 जिल्हा परिषद प्रेस थकीत येणे वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** जिल्हा परिषद मुद्रणालय, सातारा यांचेकडे दिनांक 31/03/2016 अखेर उधारीवर विक्री केलेल्या मालाची थकबाकी आहे. याबाबत लेखापरीक्षणाचे अभिप्राय खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत.

1) उधारी विक्री बिलावर ठराविक कालावधीच्यापूर्वी घेतलेल्या उधार मालाची रक्कम जमा करणेबाबतची अट नमूद करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे विहीत मुदतीत उधार मालाची रक्कम परत होते किंवा कसे? यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही होत नाही. याबाबत खुलासा करावा.

2) उधार विक्री रक्कमेवर व्हॅट टॅक्स आकारणी केलेली आहे. त्यामुळे सदर रक्कम प्राप्त होताच शासनास व्हॅट भरणा करणे आवश्यक आहे. सदर थकीत रक्कम रुपये 59,30,045/- चे 5 टक्के रुपये 2,96,502/- इतकी रक्कम जिल्हा परिषदेची गुंतून पडली आहे. वसुली त्वरीत करुन पुर्तता दाखवावी.

3) एका वर्षावरील थकीत रकमेवर शासन प्रचलित 18 टक्के द.सा.द.शे. दराने व्याजाची आकारणी करुन रक्कम वसुलात आणून जिल्हा परिषद प्रेस खाती जमा करुन घेणेत यावी. थकबाकी पत्रकामध्ये वर्षनिहाय थकबाकी

काढणेत येत नाही. तशी कार्यवाही करुन व्याजाची परिगणना करुन रक्कम संबंधीत कार्यालये / संस्था / व्यक्ती यांचेकडून जमा करुन घेणेत यावी व अग्रक्रमाने वसुली करणे आवश्यक आहे.

**3.956 वित्त प्रेषणामधील अनियमितता.**

**जिल्हा परिषद सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2015-2016 मधील वित्त प्रेषणाची पडताळणी केली असता मार्च 2016 अखेर सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक 2 नुसार वित्त प्रेषणाची रक्कम वाटप केली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सोबतच्या परिशिष्ट क्रमांक 2 नुसार दिनांक 31/03/2016 अखेर सर्व पंचायत समितीकडे सर्वसाधारणपणे रूपये 5 कोटी ते 8 कोटीपर्यंत शिल्लक रक्कम अभिकरण निधी, हस्तांतरण निधी, स्वीय निधी, देखभाल व दुरुस्ती अंतर्गत मधील आहे. यावरुन तालुक्याची मागणी ही गरजेपेक्षा जादा रकमेची केली असल्यामुळे सदर रक्कम नाहक गुंतुन राहिली आहे.

2) त्याचप्रमाणे जिल्हा परिषदेकडुन मागणी करुन घेतल्यामुळे सर्व निधी मिळून सर्वसाधारण रूपये 25 कोटी रक्कम जिल्हा परिषदेच्या लेख्याबाहेर राहिल्याचे दिसून येते.

3) जिल्हा परिषदेने ही रक्कम 30 ते 45 दिवसांची अल्प गुंतवणुक केली असती तर जिल्हा परिषदेला 7 टक्के प्रमाणे रुपये 14,60,000/- इतके व्याज मिळाले असते. या वित्त प्रेषणाच्या अनियमित वाटपामुळे व्याजाचे नुकसान झाले आहे.

**3.957 राजर्षी शाहू छत्रपती विदयानिकेतन जिल्हापरिषद निवासी क्रीडा प्रशालेच्या खात्यावरील व्याज रक्कमेबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** जिल्हा परिषद, वित्त विभाग, कोल्हापूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणामध्ये राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रशालेच्या खात्यावर व्याज रक्कम जमेबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 20, दिनांक 19/08/2017 अन्वये निर्गमित केले होते. परंतु त्यास कोणतेही अनुपालन प्राप्त न झाल्याने याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद स्वनिधीची 15 कोटी इतकी मोठी रक्कम सन 2015-16 पासून बचत खात्यातून गुंतवली असून त्यावरील अर्जित होणा-या व्याजातून परस्पर रक्कमा प्रशालेच्या नियमित खर्चासाठी वर्ग केल्या आहेत.

2) राजर्षी शाहू निवासी क्रिडा प्रशाला सुरू करणे व त्याचा खर्च उपरोक्त प्रमणे जिल्हा परिषद स्व निधी मधून केलेल्या गुंतवणूक रक्कमेच्या प्राप्त होणाऱ्या व्याजातून भागवणे या उपक्रमास मान्यता मिळणे करीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी पत्र क्रमांक कोजिप/शिक्षण/प्राथमिक/वशी-18/प्रस्ताव/2014, दिनांक 06/08/2014 अन्वये ग्रामविकास विभागास प्रस्ताव सादर केला असून त्यास अद्याप शासनाची मंजूरी मिळाली नाही. मंजूरी शिवाय केलेला खर्च नियमबाह्य आहे.

3) विद्यानिकेतन यांनी प्रतिवर्षी त्यांचा होणा-या खर्चाचे अंदाजपत्रक जिल्हा परिषेदस सादर करून ते जिल्हा परिषदेमार्फत समितीकडून मंजूर करून घेणे आवश्यक असताना तशी कार्यवाही होत नसल्याने व सदरच्या रक्कमेचा अंतर्भाव जिल्हा परिषदच्या वार्षिक लेख्यामध्ये केला जात नाही.

4) जिल्हा परिषद निधीतून केलेल्या गुंतवणुक रक्कमेवर सन 2015-16 मध्ये प्राप्त होणारे व्याजाची रक्कम राजर्षी शाहू छत्रपती विद्यानिकेतन, जिल्हा परिषद निवासी क्रीडा प्रशालेस रक्कम रूपये 1,44,60,000/- RTGS व्दारा केडीसीसी बँकेतून वर्ग करण्यात आलेली आहे.

सदर व्याज रक्कम राजर्षि शाहू छत्रपती विदयानिकेतन निवासी क्रिडा प्रशालेच्या मागणीनुसार वेळोवेळी देणे आवश्यक असताना तसे न करता परस्पर RTGS व्दारे उपरोक्त प्रमाणे प्रति तिमाहिस व्याजाची रक्कम वर्ग केली आहे.

5) प्रतिवर्षी विद्यानिकेतन स्तरावर जमा होणा-या व्याजाच्या रक्कमेचा विनियोग केल्या अंती शिल्लक निधी हा जिल्हा परिषद निधीमध्ये परत करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामूळे आज

अखेरच्या अखर्चित व्याज रक्कम व केलेल्या खर्चाचा हिशोब सादर करणे आवश्यक व त्याप्रमाणे वित्त विभागास विनियोग दाखला सादर करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही नाही.

**3.958 जिल्हा परिषद निधी, हस्तांतरण, अभिकरण निधीमधून कमी व्याज दरावर केलेल्या गुंतवणूकीने झालेल्या नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परिषद, वित्त विभाग सन 2015-16 च्या लेखा परीक्षणात जिल्हा परिषद निधी, हस्तांतर निधी, अभिकरण निधी व देखभाल दुरुस्ती खाते मधून विविध बँकामध्ये रक्कम रूपये 65,50,00,000/- इतकी गुंतवणुक केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभागाकडील दिनांक 31/07/2015 च्या टिपणीनुसार स्वनिधी मधील 35 कोटी व देखभाल दुरुस्ती खाते मधील 5 कोटी रुपये पुर्नगुंतवणुक करणेबाबत राष्ट्रीयकृत बँकेचा प्राधान्याने विचार करण्याचे सुचित केलेले असताना ही रक्कम रूपये 40 कोटी पैकी रक्कम रूपये 10 कोटी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत पुर्नगुंतवणुक केलेली आहे.

2) दिनांक 31/07/2015 च्या टिपणी नुसार 1 ते 5 कोटीहून अधिक ठेवी करीता व्याज दराचा तक्ता पाहता, बँक ऑफ इंडिया यांचा व्याजदर 7.50 टक्के असा होता तर कॅनरा बँकेचा दर 7.30 टक्के इतका असताना त्यामध्ये 10 कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याने 0.20 टक्के प्रमाणे रक्कम रूपये 9,918/- इतके व्याजाचे नुकसान लेखापरीक्षण कालावधीमध्ये झाले आहे.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक शासाउ 10.15/प्र.क्र.42/सा.उ., दिनांक 27/10/2015 अन्वये अतिरिक्त निधीची गुंतवणूकी संदर्भातील सुधारीत मार्गदर्शक तत्वे / सुचनेनुसार अतिरिक्त निधी उपलब्धतेची परिगणना किमान 1 वर्षाच्या कालावधीकरीता करण्यात यावी. आणि कमाल 3 वर्षापर्यंत मुदतठेव स्वरूपात गुंतविण्यात यावा. याबाबत सुचित केले असताना तशी कार्यवाही केली नाही.

4) दिनांक 27/10/2015 च्या मार्गदर्शक सुचनेनुसार ठेवी संदर्भात वेगळया रजिस्टर मध्ये नोंद घ्यावी व याकरीता एक स्वतंत्र नोंदवही ठेवून नियमित नोंदी करून स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तसेच बँकेत अथवा वित्तीय संस्थामध्ये गुंतविलेल्या निधीची आवश्यक ती तपासणी तथा 2-3 महिन्यांच्या कालांतराने प्रत्यक्ष बँकेत अथवा वित्तीय संस्थेमध्ये जावून नियमित स्वरुपात संबंधीत अधिका-यांनी स्वत: करावी व शिल्लक दृष्टीकरण (Balance confirmation) दर तीन महिन्यांनी बँकेत वा इतर ठिकाणी गुंतविलेल्या निधी व त्यावर प्राप्त झालेले व्याज याचा त्रैमासिक अहवाल प्रशासकीय विभागाकडे सादर करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) हस्तांतरण निधी रोकड नोंदवहीची प्रति महिन्यामधील अखेरची शिल्लक उपरोक्त प्रमाणे दिसून आली. सदर निधीमध्ये एप्रिल 15 पुर्वी पासून 17 कोटी रुपये इतक्या रक्कमेची मुदत ठेव ठेवली आहे. एकूण प्रतिमाह शिल्लक रक्कमेचा विचार करता त्याची 12 महिन्यांची सरासरी शिल्लक ही रक्कम रूपये 56,71,01,066/- इतकी असून सदर शिल्लक अथवा त्यापेक्षा कमी रक्कमेची गुंतवणुक सहज शक्य होते. परंतु त्या प्रमाणे कार्यवाही न झाल्याने सदरच्या रक्कमेवर मिळणा-या व्याजाचे नुकसान झाले आहे.

**3.959 जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरांवर अखर्चित रक्कम दिर्घकाळ ठेवल्याने झालेल्या व्याजाच्या नुकसानीबाबत.**

**जिल्हा परिषद सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणामध्ये उपरोक्त प्रमाणे पंचायत समिती स्तरांवर दीर्घ काळापासून विविध बँकेच्या खात्यामध्ये शासकीय योजनांचा निधी अनावश्यकरित्या पडून असल्याचे दिसून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपनि/2009/वित्त-3, दिनांक 10/06/2009 मधील उप परिच्छेद 2 नुसार विविध योजनांचे अखर्चित शिल्लक रक्कम तात्पुरत्या स्वरुपात अल्प गुंतवणुकी करणेचे आदेश आहेत. परंतु, यात्प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) गुंतवणुकीद्वारे प्राप्त होणारी व्याजाची रक्कम ही जिल्हा परिषद उत्पन्नाची बाब समजण्यात येईल. शिल्लक रक्कमेच्या गुंतवणूकी वरील व्याज (अल्पमुदत) (अ) अल्पमुदतीत गुंतविलेल्या रक्कमेवरील व्याज या लेखा शिर्षाखाली जमा दाखवावे व त्या रक्कमांचा विनियोग हा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार जिल्हा यादीमध्ये अंतर्भूत (पहिल्या अनुसुची) नमुद बाबींवर करण्यात यावा. अन्य कुठल्याही बाबींवर खर्च करु नये अशी तरतुद आहे. अशा प्रकरणी आवश्यक तो शिल्लक रक्कमेचा ताळमेळ घेवून तातडीने कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) पंचायत समितींनी अशी रक्कम प्रदीर्घ कालावधीपासून विविध योजनांची रक्कम गट स्तरांवर ठेवून घेतल्यामुळे जिल्हा परिषदेचे मिळणारे व्याजाचे वित्तीय नुकसान झालेले आहे. तरी याबाबत खुलासा करुन अनुपालन सादर करावे.

4) सदरची निधी कोणत्या लेखाशिर्षा अंतर्गतची अखर्चित रक्कम आहे? याबाबत पडताळणी करुन शासनखाती जमा करावी.

### 3.960 जिल्हा परिषदेकडील अखर्चीत अनुदानाच्या रक्कमा शासन लेख्यात जमा न करणेबाबत.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 10.02/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 अन्वये अखर्चीत निधी लगतच्या आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात आलेली असून त्यानंतरही अखर्चित राहीलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेकडे अखर्चित असलेला निधी संबंधीत लेखाशिर्षाखाली शासन खात्यात जमा करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

2) उपरोक्त तपशिलानुसार परिषदेकडील वेतन या बाबीवरील दिनांक 01/04/2015 रोजी अखर्चित असलेल्या रुपये 45.71 कोटी निधी पैकी रुपये 37.13 कोटी रक्कम शासन खाती भरणा केली असुन रुपये 8.58 कोटी निधी अद्याप शिल्लक असल्याचे दिसुन येते. वेतनावरील अखर्चित तरतुद वित्तिय वर्षअखेरीस लगेचच परत करणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही. वेतन या बाबीवरील अखर्चित निधी तात्काळ शासन खात्यात भरणा करून तसे अनुपालन दर्शवावे.

3) शासन खाती भरणा केलेल्या रुपये 56.18 कोटी रक्कमेच्या संदर्भात चलन / अभिलेख्याची तपासणी केली असता सन 2015-16 मध्ये विविध विभागाकडुन लेखाशिर्षनिहाय भरणा केलेल्या रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे रुपये 25.44 कोटी असल्याचे आढळून आले.त्यामुळे विवरणपत्रात नमुद केलेल्या रक्कमा व प्रत्यक्षात उपलब्ध चलन च्या रक्कमा यात तफावत असल्यामुळे अखर्चित रक्कमांचे हिशेब अचुक नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त नमुद अनियमीततेच्या अनुषंगाने परिषदे अंतर्गत सर्व विभागाकडिल अखर्चित रक्कमांचा आढावा घेऊन व भरणा केलेल्या रक्कमांचा विभागनिहाय ताळमेळ घालून अनुपालन दर्शवावे.

### 3.961 अनुदान नोंदवही नमुना 90 मध्ये खर्च व शिल्लक अनुदानाचा तपशिल न नोंदविणेबाबत.

**जिल्हा परिषद अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम नियम 244 नुसार जिल्हा परीषदेने शासकीय अनुदाने व खर्चाची नोंदवही नमुना 90 नमुन्यात नोंदवही ठेवलेली आहे. परंतु, सदर नोंदवहीत विहित रकाण्यात प्राप्त् अनुदानातुन झालेला तिमाही निहाय खर्चाचा तपशिल, शिल्लक अनुदानाची रक्कम व शिल्लक अनुदानाच्या रक्कमांची काय विल्हेवाट लावण्यात आली. याबाबतच्या नोंदी घेण्यांत आलेल्या नाहीत. त्यामुळे वर्षे अखेरीस किती अनुदान शिल्लक राहीले. याबाबतची खात्री करता येत नाही. सदर विहीत नमुन्यातील सर्व नोंदी घेवुन अनुपालन दर्शवावे.

**3.962 दिनांक 31/03/2016 अखेरच्या अखर्चीत रकमा शासन खाती जमा न करण्याबाबत.**

**जिल्हा परिषद अकोला, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासनाचे अखर्चीत निधी संबंधीचे अध्यायावत आदेश, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक- संकीर्ण 10.02/प्र.क्र.118/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008. नुसार जिल्हा परिषदेस विशिष्ट आर्थिक वर्षाकरीता मुक्त केलेला व अखर्चीत राहिलेला निधी खर्च करण्याची अनुमती देण्यात आली आहे. त्यानंतर ही तो निधी अखर्चीत राहिल्यास अनुदान निर्धारणाची वाट न पहाता शासनास तात्काळ परत करणे जिल्हा परीषदावर बंधनकारक आहे. तथापी, विभागाने सदर शासन निर्देशानुसार कार्यवाही केलेली नाही. पुर्तता दर्शवावी.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परीपत्रक क्रमांक अनिनि 2013/प्रक्र.77/वित्त2, दिनांक 09/01/2013 नुसार जिल्हा परिषदा मार्फत शासन विविध जनकल्याणाच्या योजना राबवित असतांनी योजना राबवित असतांनी योजनेच्या रक्कमा त्याच आर्थिक वर्षात खर्च न झाल्यास विभाग प्रमुखांनी 10 एप्रिल नंतर जुलैच्या आत आपल्या विभागाचे प्रथम प्राथान्याने अनुदान निर्धारण करावयाचे आहे. अशाप्रकारे कार्यवाही करणे आवश्यक असतांना विभागाने कार्यवाही केलेली नाही.

**3.963 अनुदान नोंदवही नमुना 90 मध्ये खर्च व शिल्लक अनुदानाचा तपशिल न नोंदविणे बाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता 1968 चे नियम नियम 244 नुसार जिल्हा परीषदेने शासकीय अनुदाने व खर्चाची नोंदवही नमुना 90 नमुन्यात नोंदवही ठेवलेली आहे. परंतु, सदर नोंदवहीत विहीत रकाण्यात प्राप्त् अनुदानातुन झालेला तिमाही निहाय खर्चाचा तपशिल, शिल्लक अनुदानाची रक्कम व शिल्लक अनुदानाच्या रक्कमांची काय विल्हेवाट लावण्यात आली याबाबतच्या नोंदी घेण्यांत आलेल्या नाहीत. त्यामुळे वर्षे अखेरीस किती अनुदान शिल्लक राहीले याबाबतची खात्री करता येत नाही. सदर विहीत नमुन्यातील सर्व नोंदी घेवुन अनुपालन दर्शवावे.

**3.964 अंतर्गत लेखा परीक्षण शाखेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत.**

**जिल्हा परिषद वाशिम, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 29) -** सदरबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत:-

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे परिशिष्ट 4 मधील Section-A, Section-B मध्ये अंतर्गत लेखा परीक्षणाची कार्यवाही विषद केली आहे. संहितेतील तरतुदीनुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे अंतर्गत लेखा परीक्षणासाठी पूर्णतः जबाबदार आहेत व हे त्यांचे महत्वाचे कर्तव्य आहे. तसेच ग्रामविकास विभागाच्या दिनांक 17/04/2001 च्या शासन निर्णयनुसार वरिष्ठ लेखा अधिकारी व अंतर्गत लेखा परीक्षा अधिकारी ही दोन पदे निर्माण होईपर्यंत स्थानिक निधी लेखा परीक्षा, महालेखापाल व आयुक्त या सर्वांचे लेखा आक्षेपाबाबत व लेखा परीक्षणात समन्वयक म्हणून वरिष्ठ लेखा अधिकारी यांनी अंतर्गत लेखा परीक्षणाचे कार्य करणे आवश्यक आहे. परंतु, सदर कार्यवाही केल्याबाबत अभिलेख लेखापरीक्षणात तपासनीस उपलब्ध झाले नाही.

2) अंतर्गत लेखापरीक्षण शाखा अधिक प्रभावी व्हावी जेणे करून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे योग्य पालन केले जाईल. तसेच मुंबई वित्तीय नियम 1959 मध्ये दर्शविलेल्या वित्तीय औचीत्यांच्या सूत्रांचे योग्यरित्या पालन होईल. त्यामुळे निर्माण होणाऱ्या वित्तीय अनियमितेला आळा बसेल. यास्तव अंतर्गत लेखा परीक्षण पथक आधीक कार्यक्षमरित्या कार्यरत राहण्यासाठी ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक लेखाप-2015/प्र.क्र.42/वित्त-6 दिनांक 05/12/2015 नुसार निर्देश देण्यात आले आहेत. परंतु, त्याप्रमाणे वित्त विभाग जिल्हा परिषद वाशीमने कार्यवाही केलीबाबत अभिलेख लेखा परीक्षणात तपासनीस उपलब्ध झालेला नाही.

**3.965 घसारा निधी मधून खरेदी करण्यात आलेल्या वाहनाबाबत.**

**जिल्हा परिषद यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रूपये 11,99,046/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडील वाहन क्रमांक e,p 29 जी 683 व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडील वाहन क्रमांक एम एच 29 -525 या दोन्ही वाहने निर्लेखन करून वरीलप्रमाणे दोन वाहने खरेदी करण्यात आले. परंतु सदरहू वाहने उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ व मुख्य व वित्त अधिकारी यांना न देता मुख्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ व अध्यक्ष जिल्हा परिषद, यवतमाळ यांना देण्यात आली.

2) मागील अग्रीम रुपये 55,000/- चे समायोजन केल्यानंतरच नवीन अग्रीम देय असतांना मागील अग्रीमाचे समायोजन करून न घेता वाहन खरेदी करण्याकरिता अग्रीम दिल्याचे निदर्शनास येते.

3) जुनी वाहने निर्लेखीत करण्यात आली. परंतु सदरहू वाहनाची हर्रासी करून रक्कम घसारा निधीत जमा केली नाही.

4) संबधीत विभागाने वाहनाकडे दुर्लक्ष केल्यामुळे वाहनाची झिज होत आहे. त्यामुळे वाहनाची विक्री किंमत कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) वाहनाचे लॉगबुक लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न दिल्यामुळे पुरवठा आदेशानुसार वाहन प्राप्त झाल्याबाबत सत्यता पडताळता आली नाही.

**3.966 अखर्चित निधी रक्कमा शासन खाती जमा न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/1002/प्र.क्र.28/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चीत निधी शासन खाती जमा करण्याची कार्यवाही नमुद केली आहे. त्यानुसार अखर्चीत निधी प्राप्त झाल्यापासुन योजनेवरील अनुदान 2 वर्षाच्या आत खर्च करणे व खर्च न झालेला अखर्चीत निधी शासन खाती जमा करणे आवश्यक आहे. वित्त विभागाने पुरविलेल्या विवरणपत्रानुसार दिनांक 31/03/2016 अखेर हस्तांतरीत व अभिकरण योजनेचा एकूण रूपये 90.21 कोटी अखर्चीत होता. त्यापैकी दिनांक 31/03/2017 पर्यत रूपये 18.26 कोटी शासन खाती भरणा करण्यात आले. उर्वरित निधी अद्‌याप शासन खाती भरावयाचा बाकी असुन विवरणपत्रानुसार सन 2014-2015 चे पूर्वीचा सर्व निधी शासन खाती भरणा करावयास पाहीजे होता. अनियमिततेबाबत खुलासा सादर करावा. हस्तांतरीत अभिकरण योजनेचे दिनांक 31/03/2016 अखेर रुपये 71.95 कोटी अखर्चीत निधी असुन त्यापैकी रूपये 62 कोटी जिल्हा मध्यवर्ती बँकेत अडकुन पडलेला असुन व रूपये 9.95 कोटी अखर्चीत निधी शासनास परत करणे आवश्यक आहे. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/1002/7/प्र.क्र.18/अर्थेपाय, दिनांक 06/06/2008 अन्वये दिनांक 31/03/2016 पर्यंतच्या वेतनावरील अखर्चित निधी तात्काळ शासनास जमाकरण्यता यावा असे निर्देश असतांना जिल्हा परिषदेने कार्यवाही केली नाही. जिल्हा परिषदेकडील संपुर्ण अखर्चित निधी शासन खाती जमा करुन अनुपालन सादर करावे.

**3.967 अरोखीकृत धनादेशाबाबत.**

**जिल्हा परिषद बुलडाणा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** अरोखीकृत धनादेश रोखीकृत करुन सध्या कार्यरत असलेल्या खात्यात जमा न करणेबाबत.

जिल्हा परिषद बुलढाणा, वित्त विभागाने बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँक शाखा, बुलढाणा मध्ये मोठ्या प्रमाणावर असलेल्या शिल्लक रक्कमा ह्या ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक जिपका/पमु-59, दिनांक 17/07/2012 अन्वये स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा, बुलढाणा येथील कार्यरत खात्यात वळती करणेबाबत सुचीत केले आहे. परंतु तसे करण्यात आले नाही. उपरोक्त प्रकरणी सदर रक्कमा स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा बुलढाणा मध्ये जमा करण्याबाबत कार्यवाही करुन अनुपालन दर्शवावे.

**3.968 विभागनिहाय प्रलंबित अग्रिमाबाबत.**

**जिल्हा परिषद नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रूपये 68,15,869/-खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभागाने कळविलेल्या माहितीनुसार दिनांक 31/07/2016 अखेर रूपये 68,15,869/- एवढा अग्रिम विभाग प्रमुखांकडे प्रलंबित आहे. सदर प्रलंबित अग्रिम वसुलीसाठी वित्त विभागाने नियमित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 220 नुसार अग्रिमाच्या प्रलंबित रकमा तात्काळ समायोजित करणे आवश्यक आहे. तसेच नियम 221(ब) नुसार पूर्वीच्या अग्रिमाचे पूर्ण समायोजन झाल्याशिवाय विभाग प्रमुखांना नवीन अग्रिम मंजूर करण्यात येणार नाही. याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

**3.969 रॅक खरेदीबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,98,375/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) खरेदीकरीता 3 दरपत्रके बोलविण्यात आली असुन प्रथम पुरवठादार अतुल वी. सातपुते यांचा पत्ता स्वास्तीक कॉलोनी, वर्धा आहे व पुरवठादार m/s Kshoan Enterprises,wardha यांचा पत्ता c/o A.V.satpute म्हणजेच अतुल वी. सातपुते, प्लॉट नं. 15, स्वस्तीक कॉलोनी, सिंदी मेघे, वर्धा आहे. उपरोक्त दोन्ही पुरवठादारांचा एकच पत्ता आहे Kshoan Enterprises, wardha याचे प्रोप्रायटर श्रीमती वीणा अतुल सातुपते आहे म्हणजेच दोन्ही पुरवठादार पती पत्नी असल्याचे स्पष्ट होते. महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील प्रकरण क्रमांक 4 परि.4.2 नुसार कोणत्या ही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणा-या अन्यत संस्थे / मध्ये थेट स्वारस्य असुन नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबंधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील असे असतांना दोन्हीं पुरवठादारांचे दरपत्रके नाकारणे आवश्यक असतांना ह्याकडे दुर्लक्ष करुन संबंधीत पुरवठादाराकडुन खरेदी केलेली आहे.

2) दिनांक 31/10/2015 च्या टिपणीनुसार दैनिक प्रतापगडचे वारे व साप्ताहिक कलम आंबेडकरवाद या वृत्तपत्रात खरेदी करीता जाहिरात दिली आहे. परंतु जाहिरात दिल्याबाबतचे दस्तरऐवज लेखापरीक्षाणास सादर केलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-2014/प्र.क्र.82/भाग-3/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील परि. 6.13 परिशिष्ट 13 नुसार सदर वस्तुंची खरेदी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाकडुन खरेदी करणे आवश्यनक असतांना उपरोक्त प्रमाणे दरपत्रक बोलवुन खरेदी केली आहे.

**3.970 अखर्चित रक्कम शासनास समर्पित न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद वर्धा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सन 2015-16 अखरे एकूण रुपये 40,22,73,351/- अखर्चित निधी जिल्हापरीषदेकडे शिल्लक आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 06/06/2008 अन्वेय सन 2015-16 वित्तीय वर्षाचे वेतन व भत्ते यांचे अनुदान तसेच सन 2014-15 वित्तीय वर्षाचे योजनांचे अखर्चित अनुदान शासनास समर्पित करणे आवश्यक आहे. वित्त विभागाने संबंधीत विभागाकडून अखर्चित अनुदानाबाबत पाठपुरावा करून विवरणपत्रातील अखर्चित निधी शासन खाती त्वरित जमा करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही झालेले नाही. त्यामुळे 2014-15 पूर्वी पासूनचे रक्कम रुपये 40,22,73,351/- अखर्चित अनुदान अद्याप शासन खाती जमा झाल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प्र.क्र.77/वित्त 2, दिनांक 09/12/2013 नुसार प्रत्येक आर्थिक वर्षात दिनांक 10 एप्रिल ते 15 जुलै या कालावधीत अनुदान निर्धारण होणे आवश्यक आहे.

वित्त विभागाने सन 2015-16 पर्यंत अनुदान निर्धारण केलेले नाही. तरी सन 2015-16 पर्यंत अनुदान निर्धारण करुन अखर्चित रक्कम शासन खाती जमा करण्यात यावी.

**3.971 दिनांक 31/03/2016 ला असलेल्या असंवितरीत धनादेशाबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** जिल्हा परीषद भंडाराच्या वित्त विभागाच्या सन 2015-16 च्या लेखापरीक्षणाचे वेळी विवीध निधीचे रोख पुस्तकाची दिनांक 31/03/2016 अखेरची शिल्ल्क बॅक खात्या बरोबर तपासुन पाहीले असता जिल्हा परिषद भंडाराच्या वित्त विभागाने 31/03/2016 ला मोठ्या प्रमाणावर धनादेश लिहु न संबंधीतांना वितरीत केले नाहीत याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 27 नुसार मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी तात्काळ रक्कम प्रदान करण्याची आवश्यकता असल्यास धनादेशावर स्वाक्षरी करावयास हवी. मात्र धनादेशावर स्वाक्षरी करून धनादेश स्वत: कडे ठेवणे नियमबाहय आहे.

महाराष्ट्र कोषागार नियम 1968 खंड 1 चे नियम 242 [2] प्रमाणे त्वरीत वितरणाकरीता रक्कमेची आवश्यकता असल्याशिवाय कोणतीही रक्कम कोषागारातुन आहारीत करू नये असे असतांना देखिल जिल्हा परीषद भंडाराने धनादेश लिहु न शासन अनुदान खर्ची दाखवीले आहे. हे नियमबाह्य ठरते.

**3.972 वित्त समिती सदस्यांना वाहन भाडे जादा प्रदान करणेबाबत.**

**जिल्हा परिषद भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 23) -** सदरबाबत 4 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 39,200/- खर्च करण्यात आला आहे. सदर देयकात काही सदस्यांना एस टी बसने प्रवासाची सुविधा असतांना स्वतांचे खाजगी वाहन वापर करण्याबाबत किलोमीटर दराप्रमाणे प्रवास भाडे प्रदान करण्यात आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरील प्रवास देयके ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे पत्र क्रमांक 2010/951/प्र.क्र.निरंक, दिनांक 15/11/2010 नुसार प्रमाणीत आहेत. सदर पत्रात नमुद वित्त विभाग दिनांक 04/12/1999 तसेच दिनांक 03/03/2010 शासन निर्णयाप्रमाणे अशासकिय सदस्यांना शासकिय कर्मचा-यांना दराने रेल्वे व एसटी चा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय आहे. विविध सभांना स्वत:चे वाहनाने उपस्थित राहिल्यास किलोमिटर प्रवाय भत्ता दयावे अशी तरतुद नाही.

2) मुंबई नागरी सेवा (प्रवास भत्ता) नियम 396 प्रमाणे दोन ठिकाणातील अंतर ज्यामार्गांनी कमी असेल किंवा ज्यामार्गाने प्रवास भाडे कमी असेल किंवा ज्यामार्गाने सर्व साधारण प्रवास करण्यात येतो. त्या मार्गाचे प्रवास भाडे अनुज्ञेय आहे. एस टी. प्रवास सेवा उपलब्ध असतांना वरील प्रवासाला किलो मीटर भत्ता एस.टी.भाडयापेक्षा 6 ते 9 पटीने जादा प्रदान आहे. जे अनुज्ञेय नाही व त्यामुळे निधीचे नुकसान झाले आहे. सबब रक्कम रूपये 39,200/- वसुल पात्र आहे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2013/प्र.क्र.27/पंरा-1, दिनांक 14/03/2013 अन्वये जिल्हा परीषद सदस्यांना त्यांचा कार्यक्षेत्रात राज्य मार्ग परीवहन बसने प्रवास करण्यासाठी प्रवास भत्ता अनुज्ञेय असतांना वरील प्रवासाकरीता किलोमीटर प्रवास भाडे प्रदान करने अनुज्ञेय व संयुक्तिक नाही.

**3.973 अखर्चीत रक्कमा बाबत.**

**जिल्हा परिषद गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** वित्त विभागाचे सन 2015-16 चे लेखापरीक्षण केले असता सन 2015-16 चे वार्षिक लेख्यानुसार खालीलप्रमाणे अभिकरण व हस्तांतरीत योजनेची रक्कम रूपये 20,25,67,186/- अखर्चित आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 06/06/2008 अन्वेय सन 2015-16 वित्तीय वर्षाचे वेतन व भत्ते यांचे अनुदान तसेच सन 2014-15 वित्तीय वर्षाचे योजनांचे अखर्चीत अनुदान शासनास भरणा

करणे आवश्यक आहे. वित्त विभागाने संबंधीत विभागाकडून अखर्चित अनुदानाबाबत पाठपुरावा करून अखर्चित निधी शासन खाती त्वरित जमा करण्याची कार्यवाही करणे आवश्यक होते, परंतु तशी कार्यवाही झालेले नाही. त्यामुळे 2014-15 पूर्वी पासूनचे अखर्चित अनुदान अद्याप शासन खाती जमा झाल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक प्र.क्र.77/वित्त 2, दिनांक 09/12/2013 नुसार प्रत्येक आर्थिक वर्षात दिनांक 10 एप्रिल ते 15 जुलै या कालावधीत अनुदान निर्धारण होणे आवश्यक आहे. तथापि, सन 2015-2016 पर्यंत अनुदान निर्धारण झालेले नाही. तरी सन 2015-16 पर्यंत अनुदान निर्धारण करुन अखर्चीत रक्कम शासन खाती जमा करण्यात यावी.

**3.974 अनुदान निर्धारणाबाबत**

**जिल्हा परिषद चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर सन 2015-16 या आर्थिक वर्षाचे लेखातपासणी दरम्यान अनुदान निर्धारणासंबधी नस्तीचे अवलोकन केले असता

जिल्हा परिषद चंद्रपूरच्या विभागाचे ब-याच कालावधीचे अनुदान निर्धारण झालेले नाहीत. त्यामुळे शासनाकडून किती रक्कमा येणे व शासनास किती रक्कमा देणे बाकी आहे याबाबत खात्री करता येत नाही. तरी याबाबत तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

**3.975 गुंतवणुकीबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासहीता 1968 चे नियम 222 नुसार गुंतवणुकीची नोंदवही नमुना 84 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपवी 2009/प्र.क्रं.5019/वित्त-3, दिनांक 10/06/2009 नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 कलम 100 व 123 हस्तांतर व अभीकरण योजनेखाली प्राप्त होणा-या शिल्लक रक्कमाचा विनीयोग तातडीने करावा लागणार नसेल तर काही रक्कमा तात्पुरत्या कालावधीकरीता जिल्हा परिषद ना अल्पमुदतीकरीता गुंतविण्यात येतील त्यापासुन मिळणारे व्याज जिल्हानिधीचा भाग समजण्यात येईल.अशा सुचना आहे. गुंतवलेल्या रक्कमाच्या नोंदी गुंतवणुक नोंदवही नमुना 84 मध्ये पेज क्रं. 5 व 6, 76, 52 व 94 घेतलेल्या आहे. सन 2015-16 मध्ये प्राप्त झालेले व्याज व सन 2016-2017 मध्ये अर्जीत होणारे व्याजाच्या नोंदी रजीस्टर मध्ये घेतलेल्या आहे. सन 2015-16 मध्ये प्राप्त झालेले रक्कम रुपये 3,33,21,927/- जिल्हानिधीअंतर्गत 5 व्याज अल्पमुदती रक्कमावरील व्याज खाली वेळोवेळी जमा केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-16 मध्ये घेतलेल्या सन 2016-17 अर्जीत होणा-या व्याजाच्या नोंदी रजीस्टर मधुन कमी करुन सन 2016-17 मध्ये दर्शवण्यात यावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 222 अन्वये गुंतवणुकीची नोंद नमुना 84 मध्ये घेतलेल्या आहे. परंतु गुंतवणुकीची वार्षीक पडताळणी करुन प्रमाणीत केले नाही

3) लेखा संहिता 1968 चे नियम 224 नुसार प्रत्येक सहामाहीच्या शेवटी मुख्य लेखा तथा वित्त अधीकारी यांनी नोंदवहीत दर्शविलेल्या सर्व ठेवी व प्रमाणपत्रे उपलब्ध असुन देय प्रमाणपत्राचे मुदल व व्याज जमा होण्यासाठी आवश्यक जरुर ती कार्यवाही करण्यात आली आहे. असे प्रमाणपत्र नोंदवहीत नोंदविण्यात यावे अशी तरतुद आहे.मुख्य लेखा व वित्त अधिकारी कडुन सहामाही असे प्रमाणपत्र नोंदवहीत नोंदवण्यात आलेले नाही.

4) लेखा संहिता 1968 चे नियम 223 नुसार सन 2015-2016 मध्ये अर्जीत झालेले व्याजाच्या नोंदी रजीस्टर मध्ये घेतल्या असुन व्याजाच्या रक्कमा जिल्हानिधीत जमा केलेल्या आहे. सन 2015-16 मध्ये घसारा निधी अंतर्गत गुंतवणुक रक्कम रुपये 1,10,32,098/- वरील व्याज रक्कम रुपये 9,67,317/- जिल्हानिधीत जमा केलेले आहे.

परंतु लेखा संहिता 1968 चे नियम 240 व 242 नुसार घसारा निधीतुन अल्पमुदती ठेव अंतर्गत जिल्हा परिषदेने गुंतवणुक केल्यास सदर गुंतवणुकीवरील व्याज घसारा निधीत जमा करणे आवश्यक आहे. करीता रक्कम

रुपये 9,67,317/- जिल्हानिधीतुन काढुन घसारा निधीत जमा करण्यात यावे तसेच यापुर्वी व्याजाच्या रक्कमा जिल्हानिधी जमा केलेला आहे. त्याकाढुन घसारा निधीत जमा करण्याची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**3.976 अभिकरण आकार वसुली / प्रस्तावाबाबत.**

**जिल्हा परिषद गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली अंतर्गत सन 2014-2015 मध्ये अभिकरण आकार बाबत ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक विआ 1099/प्र.क्रं.3458, दिनांक 29/05/1999 जिल्हा परिषदेकडुन राबविण्यात येणा-या अभिकरण योजना प्रत्यक्ष खर्च अनुषंगाने जिल्हा परिषदेना 5 टक्के अभिकरण आकार अनुज्ञेय आहे. त्यापैकी 4 टक्के अभिकरण आकार प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने व 1 टक्के अभिकरण आकार लेखापरीक्षण झाल्यानंतर शासनास प्रस्ताव पाठवुन प्राप्त करणेस्तव सुचना आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 मधील अखर्चित तरतुद खर्च करण्याची मुदत दिनांक 31/03/2017 होती. त्यामुळे आता प्रत्यक्ष खर्चाचे आधारे 5 टक्के येणारा अभिकरण आकार काढुन प्राप्त अनुदानाचे आधारे कपात केलेला 4 टक्के अभिकरण आकार वजा जाता जिल्हा परिषद येणे असलेल्या 1 टक्के अभिकरण आकाराचा रक्कम संबधीत विभागांनी प्रस्ताव शासनास सादर करुन अनुदान प्राप्त करुन घ्यावे प्रत्यक्ष खर्चाचे आधारे येणार 5 टक्के अभिकरण आकारपेक्षा अनुदानाच्या आधारावर कपात केलेला 4 टक्के अभिकरण आकार जादा कपात केलेला असेल तर तेवढी रक्कम शासनास जिल्हा परिषद  तर्फे जमा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

2) सन 2015-2016 विविध विभाग अंतर्गत अभिकरण मध्ये योजनेअंतर्गत रक्कम रुपये 11,42,56,000/- ची तरतुद उपलब्ध आहे. प्राप्त अनुदानाच्या 4 टक्के अभिकरण आकार रक्कम रुपये 45,70,240/- एवढा येतो. परंतु संबधीत विभागाकडुन रक्कम रुपये 27,52,440/- रक्कम रुपये अभिकरण आकार कपात केलेली आहे. तरी रक्कम रुपये 18,70,800/- एवढा अभिकरण आकार कमी कपात केलेला आहे. सदर रक्कम वसुल करुन जिल्हानिधीत जमा करण्यात यावी.

3) शासनातफे / प्रशासकीय विभागातर्फे जिल्हा परिषदकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 123 योजना राबविण्यास सोपविण्यात येत आहे. हे आदेशात स्पष्ट नसल्यामुळे ब-याच योजना अंतर्गत अभीकरण आकार कपात केला जात नाही. उ.दा. पल्स पोलीओ योजना आनंदीबाई जोशी पुरस्कार योजना, राज्य पुरस्कृत संरक्षण योजना, वृध्द कलाकारांना मानधन, अंगणवाडी इमारत बांधकाम, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना पर्यायाने जिल्हा परिषदेचे आर्थिक नुकसान होते. सदर योजना राबविण्यात जिल्हा परिषद मनुष्य बळ वापरले जाते. करीता सदर योजनावर अभीकरण आकार जिल्हा परिषद देय आहे किंवा नाही याबाबत संबधित विभागाने प्रशासकीय विभागाचे स्पष्ट आदेश प्राप्त करणे आवश्यक आहे.

4) खासदाराचा / आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रमाच्या योजना अभीकरण तत्वावर जिल्हा परिषदेकडुन राबविल्या जातात. त्या योजनासाठी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधीनियम 1961 कलम 123 नुसार 5 टक्के अभीकरण आकार अनुज्ञेय आहे. जो जिल्हा परिषद उत्पन्नाचा भाग आहे. परंतु नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक स्थानिका 2011/प्र.क्रं.36/कार्यासन 1482, दिनांक 13/09/2012 नुसार आमदार स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत येणा-या विकास कामावर सर्व संबधीत कार्यालयीन यंत्रणाकडुन अभीकरण शुल्क आकारण्यात येउ नये असे स्पष्ट केलेले आहे. परंतु शासन निर्णय महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती 1961 चे कलम 123 ला छेद देणारा आहे व ग्रामविकास मंत्रालय मुंबई याचे सहमतीने निर्गमीत झाल्याचे सदर शासन निर्णयात नमुद नाही त्यामुळे जिल्हा परिषद चे आर्थिक नुकसान होत आहे.

अभिकरण आकार नोंदवही ठेवलेली नाही. नोंदवही ठेवुन अदयावत करण्यात यावी.

**3.977 अखर्चित रक्कमा शासनास परत करणेबाबत.**

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना येथील सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणात लेखा विभागाने सन 2015-16 च्या अखर्चित रक्कमा शासन निर्णय

क्रमांक संकिर्ण10-02/प्र.क्र.128/ अखर्चित, दिनांक 06/06/2008 अन्वये पुढील वर्षाचा खर्च करता येत असल्याने त्यासाठी वित्त विभाग जिल्हा परिषद, जालना यांनी आपल्याकडील बाबनिहाय सर्व अखर्चित रक्कमांचे विवरणत्र शासनाकडे पाठविणे बंधनकारक आहे.

1) सन 2015-2016 मध्ये रक्कम रूपये 75,35,05,885/- अखर्चित शिल्लक निधी शासनास परत केलेली नाही. तरी अखर्चित रक्कम भरणा करण्यात यावी.

2) तसेच सन 2014-2015 या वर्षातील योजनाचा सन 2015-2016 अखेर झालेला खर्च वजा जाता अखर्चित रक्कम शासनाकडे महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक नियोजन विभाग 9/विकास/वि.कार्यक्रम/ 1082/ प्र.क्र.2/ योजना-6, दिनांक 16/03/1992 अन्वये आर्थिक वर्ष संपल्यानंतर एका आठवडयाच्या आत अखर्चित शासन निधी त्या त्या लेखाशिर्षाखाली शासनास परत करणे आवश्यक आहे. वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी सन 2015-2016 च्या लेखापरिक्षणात लेखा विभागाने सन 2015-2016 च्या अखर्चित रक्कमा शासन निर्णय क्रमांक 10-02/प्र.क्र.128/ अखर्चित, दिनांक 06/06/2008 अन्वये पुढील वर्षाचा खर्च करता येत असल्याने त्यासाठी वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी आपल्या स्तरावरील बाबनिहाय सर्व अखर्चित रक्कमांचे विवरणपत्र दिनांक 31/03/2016 पर्यंत पाठविणे बंधनकारक आहे.

3) तसेच सन 2014-2015 या वर्षातील योजनाचा सन 2015-2016 अखेर झालेला खर्च वजा जाता अखर्चित रक्कम शासनाकडे महाराष्ट्र शासन, निर्णय क्रमांक नियोजन विभाग 9/विकास/वि.कार्यक्रम/ 1082/प्र.क्र.2/ योजना-6, दिनांक 16/03/1992 अन्वये आर्थिक वर्ष संपल्यानंतर एका आठवडयाच्या आत अखर्चित शासन निधी त्या त्या लेखाशिर्षाखाली शासनास परत करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने दिनांक 31/03/2016 अखेर अखर्चित योजनेची अनूदाने व इतर अनूदाने बाबतची माहिती मागणी करुनही उपलब्ध न झाल्यामुळे शासन खाती भरणा केलेली रक्कम या व्यतिरिक्त शिल्लक अनूदाने नसल्याचे खात्री करता आलेली नाही.

4) क-अनूदाने वजा परतावाची प्रमाणकांची तपासणी केली असता सन 2013-2014 व सन 2014-2015 चे वेतन व भत्ते व इतर अखर्चित अनूदाने उशिराने शासन खाती भरणा केले असल्याचे दिसून आले आहे.

5) दिनांक 31/03/2016 अखेरची शिल्लक त्यानंतरच्या कामाच्या पहिल्या दिवशी वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी ई-मेल व्दारे सहसंचालक / सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांना विहीत वेळेत कळविण्याची तरतूद आहे. वित्त विभाग, जिल्हा परिषद, जालना यांनी ठेलेल्या संबंधित संचिकेची मागणी केली असता उपलब्ध करुन दिलेली नाही.

### 3.978 वित्त विभागामार्फत अंतर्गत लेखापरिक्षणाबाबत.

**जिल्हा परिषद जालना, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सशाप/1093/प्र.क्र.261/93लेखापरिक्षा, दिनांक 19/06/1995 नुसार जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने अंतर्गत लेखापरिक्षण करुन नियमित लेखापरिक्षणाचे वेळी अंतर्गत लेखापरिक्षणामध्ये निष्कर्ष कळविणे आवश्यक आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात प्रत्येक पंचायत समितीची दोन वेळा तपासणी करावयास पाहिजे.

सन 2014-2015 मध्ये विभागाकडे किती तपासण्या प्रलंबित होत्या व सन 2015-2016 मध्ये एकूण किती तपासण्या केल्याबाबतचा तपशिल लेखापरिक्षणास दर्शविण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रलंबित तपासण्यांची संख्या निदर्शनास आणता आली नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परिशिष्ट - 4 मधील तत्वाचे पालन केले किंवा कसे, यांचा बोध होत नाही. प्रलंबित तपासण्यांची संख्या निरंक करुन अहवाल लेखापरीक्षणास दर्शविण्यात यावा.

दिनांक 19/06/1995 च्या परिपत्रकानुसार सन 2015-2016 चे अंतर्गत लेखापरिक्षणाचे निष्कर्षानुसार कार्यवाही करुन अनूपालन अहवाल दर्शवावे.

**3.979 जिल्हा परिषदेने विविध निधीतुन केलेल्या गुंतवणुकीबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद बीडचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षणात वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या तपशीलानुसार जिल्हा परीषदेने गुंतवणुक केलेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषद स्वनिधीचे डीसीसी बँकेतील गुंतवणुकीवर सन 2011-2012 ते सन 2015-2016 पर्यंत कोणतेही व्याज प्राप्त झालेले नाही. तरीही तेथेच मुदत ठेवी ठेवण्यात आल्या आहेत.

2) जिल्हा परिषद स्वनिधीचे एसबीएच बँकेतील गुंतवणुकीवर सन 2014-2015 ते सन 2015-2016 पर्यंत कोणतेही व्याज प्राप्त झालेले नाही.

3) जिल्हा निधीमध्ये जमा झालेल्या रक्कमांची एम.जी.बी. व एस.बी.एच. बँकेतील गुंतवणूकीवरील अनुक्रमांक 02,03,18,19,20,21,23 चे रक्कमांवर कोणतेही व्याज मिळालेले नाही. तसेच अनुक्रमांक 18,19,20,21,23,26 वरील मुदत ठेवींची मुदत पुर्ण दिनांक उपलब्ध करण्यात आलेले नाहीत.

4) अभिकरण योजनांच्या रक्कमांची डि.सी.सी.बँकेतील गुंतवणूकीवर सन 2012-2013 वगळता सन 2011-2012 ते 2015-2016 या वर्षातील रकमांवर कोणतेही व्याज मिळालेले नाही.

5) अभिकरण योजनांच्या रक्कमांची एस.बी.एच. बँकेतील गुंतवणूकीवर सन 2014-2015 ते सन 2015-2016 पर्यंत कोणतेही व्याज प्राप्त झालेले नाही.

उपरोक्त 01 ते 05 अभिप्राय वित्त विभागाने उपलब्ध करुन दिलेल्या विवरणपत्रांवरुन देण्यात येत आहेत. गुंतवणुकीवर यापुर्वीही विविध परिच्छेद घेण्यात आलेले आहेत. उदा. विशेष लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 20, 21, 22, 23 तसेच सन 2014-2015 चे लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक 20, 21, 28, 34, 35. सदर आक्षेप कायम आहेत.

6) वित्त विभागाने नमुना नंबर 84 ठेवलेली आहे. परंतु, त्यातील सर्व रकाने भरण्यात आलेले नाहीत. तसेच यातील नोंदी प्रमाणीत करण्यात आलेल्या नाहीत व मिळणारे व्याज कोठे जमा होत आहे? याची खात्री केलेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 222 प्रमाणे वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी गुंतवणूकीची नोंद ही नमुना नंबर 84 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. उक्त नोंदवहीत परिषदेच्या मालकीच्या सर्व गुंतवणुकी कोणत्या प्रयोजनासाठी प्रत्येक रक्कम धारण करण्यात आली? ते त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या स्तंभात नमुद करण्यात येईल आणि प्रत्येक बाबीसमोर सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश नमुद करण्यात येईल. तथापि, असे कोणतेही आदेश वित्त विभागाने नमुद केलेले नाहीत. तसेच गुंतवणुकीच्या एकुण रकमांची पडताळणी दरवर्षी करणे आवश्यक असताना वार्षीक पडताळणी एकदाही केलेली नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 223 नुसार उक्त नोंदवहीत व्याज दर्शविण्यात येईल. वर्षाअखेरीस व्याजाची देय वसुल झालेली व शिल्लक रक्कम दर्शविणारा गोषवारा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे स्वाक्षरीनिशी नमुद करावयास पाहिजे. परंतु, वित्त विभाग, जिल्हा परिषद बीड यांनी अशी कार्यवाही केलेली नाही.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम क्रमांक 224 नुसार प्रत्येक सहा महिन्यांनंतर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी राष्ट्रीय बचत पत्रे, सरकारी वचनपत्रे व ऋणपत्रे यांचे गुंतवणुकीच्या नोंदवहीशी पडताळणी करणे आवश्यक आहे. परंतु, अशी कार्यवाही केलेली नाही.

10) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 109(3क)(तीन) नुसार निधीच्या गुंतवणुकीची व्यवस्था व विनिमय करण्यास स्थायी समिती सक्षम असल्याने प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवावयास पाहिजे. परंतु, यानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

11) गुंतवणुक मंजुरीबाबत संचिका लेखापरीक्षणास उपलब्ध न करुन दिल्याने गुंतवणुकीबाबतचे आदेश व बँकेसोबत केलेला पत्रव्यवहार तपासता आलेला नाही. तसेच शासन निधीच्या बाबतीत सदरच्या गुंतवणुका कोणत्या लेखाशीर्षांतर्गत बचत करुन अथवा अखर्चित असल्याने त्यांच्या गुंतवणुका केल्या? याबाबतचा तपशील उपलब्ध झाला

नाही. तसेच जिल्हा परिषदेकडे शासनाची रक्कम रुपये 3,39,79,85,308/- एवढी अखर्चित रक्कम असताना ती रक्कम शासन खाती न भरता जिल्हा परिषद त्या रकमांची गुंतवणुक करत असल्याचे प्रथमदर्शनी आढळते.

**3.980 अखर्चित रकमा शासन खाती भरणा न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद बीड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जिल्हा परिषदेने नमुना नंबर 19, 90 ठेवलेले नसुन तसेच संबंधीत विभागाचे अनुदान निर्धारण अहवाल उपलब्ध झालेले नाहीत. सदर माहिती वित्त विभागाचे नमुना नंबर 14, 20, वार्षीक लेखे (सन 2013-2014 पर्यंतचे वार्षीक लेखे त्रुटींच्या अधीन राहुन प्रमाणीत केले आहेत) विभागांचे विविध संचिका यावरुन तयार करण्यात आली आहे.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार जिल्हा परिषद, बीड ची सन 2015-2016 अखेर अखर्चित रक्कम रूपये 2,28,87,56,903/- आहे. लेखापरीक्षणात आढळुन आलेल्यानुसार सन 2015-2016 अखेर अखर्चित रक्कम रूपये 3,39,79,85,308 /- आहे. त्यापैकी सन 2010-2011 पुर्वीची अखर्चित रक्कम रूपये 88,72,09,075/- आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीनुसार व लेखापरीक्षणात आढळुन आलेल्यानुसार या दोहोतील तफावत रूपये 1,10,92,28,405/- एवढी आहे. तसेच दिनांक 15/09/2014 रोजी जिल्हा निधीतुन (हस्तांतरीत) रूपये 10,00,00,000/- जिल्हा परिषद स्वनिधीकडे वर्ग केलेले आहेत. त्यामुळे अखर्चित रक्कमेमध्ये उपरोक्त रक्कम अधिक करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद बीड चे दिनांक 31/03/2016 अखेर बँक् शिल्लक (मुदत ठेवींसह) रूपये 3,43,04,45,401/- आहे.

2) जिल्हा परिषदेने रूपये 75,09,87,732/- ची चलने शासन खाती भरणा केल्याचे दर्शवले असुन पैकी रूपये 65,18,19,862/- चे चलन उपलब्ध करुन दिले असुन रूपये 9,91,67,870/- चे चलन उपलब्ध करुन दिलेले नाहीत व उपलब्ध चलनांपैकी रूपये 45,00,86,475/- चे चलन कोषागाराचे कोषवाहिनीमध्ये उपलब्ध झाली नाहीत.

3) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-10.02/प्र.क्र.128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार शासनाने जिल्हा परिषदांना आर्थिक वर्षात मुक्त केलेला व त्या वर्षात अखर्चित राहीलेला निधी पुढील आर्थिक वर्षापर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे. परंतु, त्यानंतर तो निधी शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे वित्त विभागाने विविध लेखाशीर्षांतर्गत अखर्चित निधी रक्कम रूपये 3,39,79,85,708/- शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

4) उपरोक्त अखर्चित रकमेपैकी रक्कम रूपये 1,46,95,71,231/- ही आस्थापना अनुदानाची असुन सदर रक्कम त्या त्या आर्थिक वर्षाअखेर शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**3.981 आयकराची रक्कम कमी कपात केल्यामुळे झालेल्या अतिप्रदानांबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रूपये 4,02,64,773/- खर्च केलेला आहे.

प्रमाणकान्वये लेखापरीक्षणांत असे निदर्शनांस आले की, आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (जे) नुसार 10 टक्के आयकर कपात न करता 02 टक्के आयकर कपात करण्यांत आलेला आहे. त्यामुळे रक्कम महाऑनलाईन मुंबई व S2 Infotech Private Limited यांना जादा प्रदान झाले आहे. सदरील रक्कमेवर 02 टक्के आयकर कपात करण्यांत आलेला आहे. त्यामुळे कमी कपातीची 08 टक्के रक्कम रुपये 24,45,035/- (रुपये 25,05,589/- महाऑनलाईन व रक्कम रुपये 39,446/- S2 Infotech Private Limited) या कंत्राटदारास जादा प्रदान झालेली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) जिल्हा परीषदेने उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचे पत्र क्रमांक तेविआ-2011/प्र.क्र.42/ वित्त-4, दिनांक 17/04/2012 नुसार संस्थेने ग्रामपंचायतीस पुरविलेल्या ऑपरेटरच्या सेवेबदल 02 टक्के आयकर कपात केला आहे. आयकर अधिनियम 1961 चे कलम 194 (जे) नुसार तांत्रिक सेवा

पुरवठादाराकडून मुलत: 10 टक्के दराने आयकराची कपात करावयाची आहे. तसेच या कलमामधील तरतुदीमध्ये अशाप्रकारे सुट देण्यांसाठी अपवाद नमुद केलेले नाहीत. असे असतांनाही नियमबाहय कमी कर कपात करुन संस्थेचे हित जोपासले आहे.

2) तेरावा वा वित्त आयोग (मनुष्यबळ) योजनेसाठी सदरील अनुदान कधी प्राप्त झाले? याबाबतची अभिलेखे / नोंदवहया तपासणीकरीता उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यामुळे ग्रामविकास विभाग, शासन निर्णय दिनांक 30/08/2010 नुसार ग्रामपंचायत व पंचायत समितीस्तर अनुदानाची रक्कम 05 ते 07 दिवसात वाटप करणे क्रमप्राप्त आहे. तथापि, विलंबाने वाटप केले असल्यास जिल्हा परीषदेला सदरील रक्कमेवर ग्रामपंचायतीस व्याज प्रदान करणे आवश्यक आहे.

**3.982 गुंतवणुक रक्कमेवर कमी व्याज प्राप्त होणे व इतर अनियमितताबाबत.**

**जिल्हा परिषद परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रूपये 77,00,00,000/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सन 2015-2016 या वर्षात गुंतवणुकीपासून जिल्हा परीषद, परभणीला रक्कम रुपये 1,46,64,467/- व्याजाची प्राप्ती झाल्याचे नमुद केले आहे. प्रत्यक्षात जिल्हा परीषदेला रक्कम रुपये 38,44,848/- इतके कमी व्याज प्राप्त झाले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 222 अन्वये गुंतवणुक नोंदवही नमुना नंबर 84 मध्ये ठेवणे आवश्यक आहे. परंतु, सदरील नोंदवही लेखापरीक्षणांत दर्शविली नाही. तसेच लेखा संहिता नियम 223 अनुसार व्याजाची देय, वसुल झालेली व शिल्लक रक्कम दर्शवून मुख्य लेखा व वित अधिकारी यांच्या सहीनिशी नमुद करावा, असे नमुद असतांना त्यानुसार कार्यवाही झाली नाही. जर नोंदवही परीपुर्ण केली असती, तर सदरील व्याज रक्कम बॅकेकडून कमी प्राप्त झाले, याबाबत शहनिशा झाली असती. तरी नोंदवही नियमानुसार पुर्ण करुन इतर प्रकरणांत व्याजाच्या रक्कमांचे नुकसान होणार नाही, याची शहनिशा करावी.

3) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, जिपनि-2009/प्र.क्र.-5011/वित्त-3, दिनांक 10/06/2009 अन्वये हस्तांतरण, अभिकरण योजनेच्या शिल्लक रक्कमांचा विनियोग लागणार नसेल, तर सदरील रक्कमां तात्पुरत्या कालावधीपुरत्या गुंतवणुक करणेबाबत नमुद केले आहे. तसेच सदरील गुंतवणुक केलेल्या रक्कमा हया योजनेच्या शिल्लक रक्कमेतून केल्या, याचा तपशिल प्राप्त होऊ शकला नाही. तसेच गुंतवणुक केलेल्या रक्कमा हया अखर्चीत अनुदान / शासनांस परत करावयाच्या रक्कमा होत्या किंवा कसे, याची तपशिलाअभावी पडताळणी करता आली नाही. तरी याबाबत अनुपालन सादर करण्यांत यावे.

4) उपरोक्त शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे जिल्हा परीषदेने गुंतवणुक रक्कमा हया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकात किंवा त्या जिल्हयाच्या कोषागाराचे व्यवहार ज्या बँकामार्फत चालतात, त्या बँकेत ठेवाव्यात, असे नमुद केले आहे. परंतु, जिल्हयाच्या कोषागाराचे व्यवहार हे राष्ट्रीयकृत बॅकेत असल्यामुळे जिल्हा परीषदेने सदरील गुंतवणुक ही राष्ट्रीयकृत बँकेत करणे आवश्यक असतांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत मोठया प्रमाणावर गुंतवणुक केली आहे. सदरील गुंतवणुक ही बँकेच्या वेळोवेळी जाहीर केलेल्या प्रचलीत व्याज दरानुसार करण्यांत आली आहे. मोठया प्रमाणात गुंतवणुक करणा-या ग्राहकांना बँका हया विशेष अधिकारात प्रचलित व्याज दराशिवाय काही प्रमाणांत अधिक व्याज दराच्या योजना राबवित असतात. याबाबत बँकेशी पत्रव्यवहार वा प्रत्यक्ष वाटाघाटी करुन जादा दराचा फायदा मिळू शकेल. तथापि, अशी कार्यवाही झाल्याचे अभिलेख्यांवरुन दिसून आले नाही.

5) शासन निर्णय दिनांक 10/06/2009 अन्वये सदरील रक्कमेचा खर्च हा जिल्हा परीषद व पंचायत समिती अधिनियम 1961 च्या जिल्हा यादीमध्ये अंतर्भुत असलेल्या (पहिल्या अनुसुचीच्या) नमुद बाबीवरच खर्च करावा, असे नमुद केले असून प्रस्तुत प्रकरणी खर्च कोणत्या बाबीवर केला? याचा तपशिल लेखापरीक्षणांत तपासणीकरीता उपलब्ध करुन दिला नाही. तरी सदरील प्राप्त व्याज रक्कमेतून कोणता खर्च केला? याची अभिलेखे दर्शवून अनुपालन करण्यांत यावे.

6) जिल्हा परीषदेस 13 वा वित्त आयोग (मनुष्यबळ) योजनेसाठी प्राप्त अनुदान ज्या दिवशी प्राप्त होईल, त्यानंतर त्वरीत लवकरात लवकर म्हणजेच दोन ते तीन अथवा सात दिवसामध्ये सदरील निधीचा विनियोग त्या बाबीवर करणे हे 13 वा वित्त आयोगाच्या शासन निर्णयात नमुद केले आहे, तथापि, हा निधी मुदतठेव स्वरुपात गुंतवणुक नियमबाहय केली आहे.

7) तसेच गुंतवणुक संचिकेची तपासणी केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहे मे-2015 मध्ये तीन योजनेतून (हस्तांतरण, अभिकरण व जि.प.उपकर) रक्कम रुपये 52 कोटी रक्कमेस 10 महिने 15 दिवस म्हणजेच 320 दिवसाकरीता गुंतवणुकीकरीता मंजूरी प्रदान केली आहे. परंतु, सदरील रक्कमेची गुंतवणुक वित्त विभागाकडून का केली नाही अथवा केली असल्यास सदरील गुंतवणुक रक्कमेतून जिल्हा परीषदेस किती व्याज प्राप्त झाले? या बाबतची अभिलेखे दर्शवून अनुपालन करण्यांत यावे.

**3.983 निवृत्त वेतन प्रकरणातील अतिप्रदानातील वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद हिंगोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली सन 2015-2016 या वित्तिय वर्षाच्या लेखा परिक्षणात एकूण 23 निवृत्ती वेतन प्रकरणे मंजूर करण्यात आली. त्यातील माहे 12/2015 व 3/2016 या महिन्यात मंजूर झालेल्या प्रकरणांची तपासणी केली असता, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परिशिष्ट 4 नियम 64 (1) व 64 (2) नुसार वित्त विभागाने प्राधिकृत करुन निर्गमित केलेल्या निवृत्तीवेतन प्रदान आदेशावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती व विविध विभागाकडुन निवृत्ती वेतनाचे प्रदान करण्यात येते. सदरची प्रमाणके मासिक लेख्यासोबत वित्त विभागात लेखापरिक्षण करुन निवृत्तीवेतन नोंदवही एपीपी. 9 मध्ये नोंद घेऊन प्राधिकृत केल्याप्रमाणेच प्रदाने झाली असल्याची खात्री होणे आवश्यक आहे.

2) अतिप्रदान झालेल्या जादा वेतन अदाई / इतर वसुली अधिकारी / कर्मचारी यांचे, विविध विभागाकडुन सेवा निवृत्ती प्रकरणे सादर करण्यात येतात. काही प्रकरणामध्ये जादा वेतन अदाई किंवा इतर वसुली करण्याबाबत आदेशाच्या अनुषंगाने वसुली करण्यात येते. परंतु, जादा वेतन अदाई किंवा इतर वसुलीची नोंदवही अदयावत नसल्याने झालेली वसुली कोणत्या शिर्षाकाखाली जमा करण्यात आली, केव्हा करण्यात आली, याची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्राधिकृत केलेल्या दराने वसुली झाल्याची खात्री करता आली नाही. 23 प्रकरणांत शासकीय वसुली झाली असल्याची खात्री करता आली नाही.

वित्त विभागाने निवृत्तीवेतन आदेशात अतिप्रदान झालेल्या रक्कमा पंचायत समिती स्तरावर प्रदान करतांना कपात करण्यात आल्या किंवा नाही, याबाबत नोंदवही न दर्शविल्याने खात्री करता आली नाही. कार्यवाही पुर्ण करुन अनुपालन दर्शवावे. परिशिष्ट 3 नियम 94 नुसार प्रत्येक संवितरण अधिकारी यांनी प्रत्येक सहामाहीस उपलब्ध नसलेल्या निवृत्तीवेतन धारकांचे विवरणपत्र जिल्हा परिषदेस सादर करणे आवश्यक आहे. या विवरणपत्रात 1 भागांत 3 वर्षापेक्षा जास्त काळापासुन निवृत्ती वेतन धारकांची नावे तसेच दुस-या भागात 1 वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन निवृत्तीवेतन घेत असलेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या नावाचा समावेश करणे आवश्यक आहे. विवरणपत्रातील पहिल्या भागातील धारकाच्या व तसेच मृत्यु प्रकरण 1 वर्षापासुन थकीत रक्कमा प्रदान न झालेल्या धारकांच्या निवृत्तीवेतन प्रदान आदेशाच्या संवितरण भाग विवरणापत्रासोबत वित्त विभागास परत प्राप्त झाला पाहिजे. परंतु, अशी कार्यवाही झालेली नाही. याबाबत पंचायत समीतीकडुन नियमित विवरणपत्र घेऊन अनुपालन दर्शवावे.

**3.984 जिल्हा परिषद मध्यवर्ती भांडार विभागाकडून वितरीत लेखन सामुग्रीच्या थकीत रक्कमा वसुलीबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** सन 2015-2016 च्या वित्त विभागाच्या लेखापरीक्षणास मध्यवर्ती भांडार लेखन सामुग्री नोंदवहीची तपासणी केली असता जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत पंचायत समित्या व जिल्हा परिषद अंतर्गत विभागांना लेखन सामुग्रीचा पुरवठा करण्यात आला. परंतु, साहित्य

पुरवठ्यापोटी येणे असलेल्या रक्कमा सन 2007-2008 पासून थकीत असल्याचे आढळून आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त थकीत रक्कमा ह्या सन 2007-2008 पासून थकीत असल्याचे विभागाने आपल्या विवरणपत्रात दर्शविले आहे. मागील पाच वर्षापासूनच्या थकीत मागण्या वसुलीबाबत वित्त विभागाने पुरेसे प्रयत्न केलेले नाहीत. तरी याबाबत थकबाकीची एकूण रक्कम रूपये 18,18,971/- वसुली संदर्भात ठोस उपाययोजना करून रक्कम वसुलीची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन आदेश क्रमांक झेडपीए-2000/प्र.क्र.56/33, दिनांक 17/04/2001 चे परिशिष्ट-2(7)(2) नुसार विभाग व कार्यालयाकडून येणे असलेल्या रक्कमेच्या वसुलीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी लेखाधिकारी यांची असून त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

**3.985 नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रक्कम गुंतून पडलेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद नांदेडचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नांदेड मध्ये वित्त विभाग, जिल्हा परिषद नांदेडच्या असलेल्या विविध निधीच्या खात्यांचे बँक विवरणपत्र व रोखवही नमुना नंबर 7 ची तपासणी केली असता सदर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खालील तपशिलाप्रमाणे मोठ्या प्रमाणावर रक्कमा पडून आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वित्त विभागाचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात सन 2015-2016 या आर्थिक वर्षामध्ये उपरोक्त बँक खात्यातील पडून असलेल्या रक्कमा प्राप्त करून घेण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची संचिका सादर पडताळणी केली असता. वित्त विभागाने सदर रक्कम निष्कारण गुंतून पडलेली आहे. रक्कम प्राप्त करून घेण्याऐवजी सदर बँकेतील असलेल्या अल्पमुदत ठेवीची मुदत वाढवून घेतल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु, सदर बँक खात्यामध्ये गुंतून पडलेल्या रक्कमांवरील व्याजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी उक्त रक्कमा शक्य तितके लवकर वसूल करून घेणे परिषदेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 57 नुसार सामान्यरोखवही नमुना नंबर 7 मधील अखेरची शिल्लक आणि नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बँक स्क्रोल मधील अखेरची शिल्लक यांचा ताळमेळ घेवून तफावत शोधून काढणे व सदर रक्कमेचा गैरवापर टाळण्याच्या उद्देशाने रक्कमा वसूल करून स्टेट बँक ऑफ हैदराबादचे खात्यांमध्ये जमा करणे आवश्यक आहे.

**3.986 अंतर्गत लेखापरीक्षण प्रभावीपणे न करणेबाबत.**

**जिल्हा परिषद नांदेड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन-2015-2016 च्या लेखापरीक्षणात वित्त विभाग, जिल्हा परिषद नांदेड च्या अंतर्गत लेखापरीक्षण शाखेने अंतर्गत लेखापरीक्षण प्रभावीपणे केले नसल्याचे दिसून आले आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाप-2015/प्र.क्र.42/ वित्त-6, दिनांक 05/12/2015 अन्वये अंतर्गत लेखापरीक्षण पथकांची निर्मिती करून त्यांचा संभावे दौरा कार्यक्रम मंजूर करून त्याप्रमाणे सर्व विभाग व पंचायत समित्यांचे अंतर्गत लेखापरीक्षण करणे आवश्यक आहे. तथापि वित्त विभाग अंतर्गत लेखापरीक्षण शाखेने 16 पंचायत समित्या व विभांगापैकी सन 2015-16 चे फक्त देगलूर, नांदेड, मुदखेड, धर्माबाद, भोकर, नायगाव व उमरी चे लेखापरीक्षण केले. उर्वरित विभाग व पंचायत समित्यांचे अंतर्गत लेखापरीक्षण केलेले नाही. नियमानुसार कार्यवाही केलेली नाही.

**3.987 जिल्हा परिषद चालवत असलेल्या कर्मशाळा (यांत्रीकी) येथे कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचे वेतन व भत्ते रूपये 7,22,947/- जिल्हा उपकरातून नियमबाह्य प्रदानाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** वित्त विभाग, जिल्हा परिषद, उस्मानाबादचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणात जिल्हा परिषद चालवत असलेल्या कर्मशाळा (यांत्रिकी) या योजनेतून किती उत्पन्न प्राप्त झाले व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यावर किती खर्च झाला? याबाबत लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले आहे की, प्रस्तुत योजनेतून सन 2015-2016 या वित्तीय वर्षात उत्पन्न निरंक असून खर्च रूपये 7,22,947/- झालेला आहे.

जिल्हा परिषद, उस्मानाबादने कर्मशाळा (यांत्रिकी) ही योजना ना नफा ना तोटा या तत्वावर राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

प्रस्तुत योजनेतील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्याचे देयकाची तपासणी केली असता एकूण 2 कर्मचारी आस्थापनेवर असून त्यांचे वेतन व भत्ते जिल्हा परिषद उपकरातून अदा करण्यात येतात. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येतात:-

1) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे अनुसुची 100 अंतर्गत जिल्हा परिषदेने आपल्या उत्पन्नातून खर्च करावयाच्या बाबी अंतर्भुत केलेल्या असून प्रस्तूत प्रकारचा खर्च अनुसुचीत अंतर्भूत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक GWO-1477/5220/XVI दिनांक 31/03/1978, ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक एलएफसी-1078/1321/सीआर 601/25 दिनांक 26/02/1979 व ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक GWO-1480/4617/(4517)/XVI दिनांक 31/07/1981 नुसार उपकरातून कोणत्याही प्रकारचे वेतन व भत्याच्या रक्कमा अदा करता येत नाही. असे असताना ही प्रस्तुत योजनेतील कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्याचे अदायी उपकरातून का व कोणत्या प्राधिकारान्वये नोंदवली? याचा खुलासा होणे आवश्यक आहे. आता खर्चासह प्रस्ताव तयार करून जिल्हा परिषदेचे मान्यतेने शासनास सादर करून शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

3) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 19 परिशिष्ट 4 नुसार जिल्हा निधीतून करण्यात येणाऱ्या सर्व खर्चावर नियंत्रण ठेवणारी सामान्य तत्वानुसार वित्तीय प्राधिकार प्रदान करण्यासंबंधीच्या सर्व आदेशांची काळजीपूर्वक छाननी करण्यात आली पाहीजे. कारण एकदा ते स्विकारण्यात आल्यानंतर मंजुरीची तसेच खर्चाची व इतर व्यवहाराची कोणत्याही अनिश्चित कालावधीपर्यंत उक्त आदेशाच्या आधारे लेखापरीक्षा करण्यात येण्याची शक्यता असते. म्हणून मुख लेखा व वित्त अधिकारी यांनी त्याकडे वैयक्तिक लक्ष देणे आवश्यक असेल आणि ते मान्य करण्यापूर्वी ते रितसर स्विकारले पाहीजे, असे स्पष्ट नमूद असताना प्रस्तुत प्रकरणात मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी योग्य ते लक्ष दिल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. स्पष्टीकरण व्हावे.

**3.988 जिल्हा परिषदांकडे स्व निधीतून निर्माण केलेल्या पदाबाबत.**

**जिल्हा परिषद उस्मानाबाद, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) जिल्हा परिषद, उस्मानाबाद ने जिल्हा परिषद ठरावाव्दारे जिल्हा परिषदेच्या वित्त विभागात कनिष्ठ लेखाधिकारी पद निर्माण करण्यात आले असून या पदावर नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यावरील खर्च जिल्हा परिषदेच्या स्वत:च्या उत्पन्नातून केला जातो. अशा कर्मचाऱ्यांवरील खर्च जरी जिल्हा परिषदेच्या निधीतून करणेत आला असला तरी त्याचा “संवर्ग” स्वतंत्र ठेवण्यात आलेला नाही. असे कर्मचारी इतरत्र बदलले जातात किंवा इतर पदावर पदोन्नतीने नियुक्त केले जातात. हे अनियमित आहे. तसेच कालेलकर निवाड्याप्रमाणे सदर कर्मचाऱ्यांना भविष्य काळामध्ये नियमित आस्थापनेवर सामावून घेणे सक्तीचे ठरणार आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांचा खर्च प्रथमत: जरी स्व:निधीतून होत असला, तरी त्यांना नेहमीच्या आस्थापनेवर बदलून घेतल्यानंतर किंवा दुसऱ्या संवर्गात बदली अथवा पदोन्नतीने नियुक्ती झाल्यास अशा कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन व सेवानिवृत्तीचे इतर फायदे यावरील खर्चाचा बोजा शासनावर पडण्याची शक्यता आहे.

वास्तविक जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 243 मधिल तरतुदीनुसार कोणत्याही संवर्गातील कर्मचाऱ्यांची संख्या अथवा रचना पुरविण्याचा अधिकार शासनास आहे. अशा पदाचे निर्मीतीस शासनाचे मंजूरीची आवश्यकता आहे.

2) जिल्हा परिषद, उस्मानाबादव्दारा स्वत:चे निधीतून निर्माण केलेली वित्त विभागातील पदे (1 कलेअ व यांत्रिकी कर्मशाळाकडील पदे आहेत. वित्त विभागासाठी निर्माण पदांचे वेतनावरील खर्च जिल्हा परिषद स्वत:चे उत्पन्नातून जरी करत असली, तरी सदरील कर्मचारी यांचे रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदान भरणा करण्यात येत नाही. वित्त विभाग अंतर्गत स्वनिधीतून निर्मित पदावरील कर्मचारी यांची बदली / बढती जिल्हा लेखा सेवेमध्ये करण्यातबाबत प्राधिकार दर्शवावा.

**3.989 अनुदान निर्धारणाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक अनिनि 2013/प्र.क्र.77/वित्त-2, दिनांक 09/12/2013 अन्वये ज्या कारणासाठी अनुदान मंजुर करण्यात आले होते. त्याच कारणासाठी अनुदान खर्च केल्याची खातरजमा संबंधीत प्रशासकीय विभागाच्या अनुदान निर्धारण करणे आवश्यक आहे. तसेच अनुदान निर्धारणानंतर शासन व जिल्हा परिषद मधील हिशोब पूर्ण करून कार्यवाही करणे आवश्यक आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2) जिल्हा परिषद लातूरचे सर्व विभागाचे अनुदान निर्धारण करणे प्रलंबित आहे. याबाबत स्पष्टीकरण करून अनुपालन दर्शवावे.

**3.990 अंतर्गत लेखापरीक्षणाबाबत.**

**जिल्हा परिषद लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 18) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

वित्त विभाग, जिल्हा परिषद लातूर सन 2015-2016 या वित्तीय वर्षात पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या उत्पन्न व खर्चाचे अंतर्गत लेखापरीक्षण करण्यात आलेले नाही. अंतर्गत लेखापरीक्षक शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कार्यालयीन कामकाज व पडताळणीचे कामकाज करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक लेखाप-2015/प्र.क्र.42/वित्त, दिनांक 05/12/2015 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या कामासाठी निर्माण करण्यात आलेल्या अंतर्गत लेखापरीक्षा अधिकारी या पदाच्या कार्यसुचीबाबत शासनाचे सुस्पष्ट असे निर्देश दिले आहे की, लेखाअधिकारी (गट-ब) व वरिष्ठ लिपिक (दोन) व कनिष्ठ लिपिक (एक) यांनी लेखापरीक्षणाचे काम पहावे व हे काम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नियंत्रणाखाली करण्यात येतील.

2) उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम वित्त विभागातील अंतर्गत लेखापरीक्षण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांची पदस्थापना देऊन सुध्दा केलेले नसल्यामुळे अपहारीत / आर्थिक गैरव्यवहार प्रकरणे वेळीच उघडकीस येत नाहीत व गैरव्यवहार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक प्रकारची भिती किंवा वचक राहीलेला नाही. तेंव्हा अंतर्गत लेखापरीक्षण शाखेत नेमणूक करण्यात आलेले कर्मचारी यांनी सन 2015-2016 या वित्तीय वर्षात केलेल्या कामाचे पुनर्विलोकन व्हावे.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एटीपी 1092/सीआर 766/13, दिनांक 07/10/1997 अन्वये शासनाकडून अंतर्गत लेखापरीक्षणासाठी मंजूर आकृतीबंध अन्वये पदे निर्माण करून त्यानुसारच नेमणुका देण्यात आलेल्या आहेत. वित्त विभागातील मंजूर असलेल्या लेखा संवर्गातील पदावरील कर्मचाऱ्यांचा वापर अंतर्गत लेखापरीक्षणासाठीच करण्यात यावा असे सुस्पष्ट आदेश असताना अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.